# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | ११ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ५०**

MAHMAR 19356/13/1/2000-TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ११ / ऑक्टोबर २००१

## संपादकीय

### दुःखात सहभागी होणारी माणसं....

अकरा सप्टेंबर नंतर जगातले एकही प्रसिद्धी माध्यम अमेरिकेच्या बातमी शिवाय प्रसिद्ध झालेले नाही. खरे म्हणजे नेहमी सारखाच तो दिवस सुरू झाला होता. पण त्या सकाळी अमेरिकेत जे घडले, जे अवघ्या जगाने पाहिले ते आठवले तरी तरी वाटतं, 'काही खरं नाही, हेच खरं !''


प्रवास सुरु करायचा म्हणून ज्या विमानात प्रवासी बसले ते विमान नियंत्रण कक्षेच्या बाहेर जाताच एकाएकी दिशा बदलते काय व अशी आणखी तीन विमानं भलत्याच दिशेने जातात काय आणि जगभर एकच हाहाकार होतो काय ....... कोणत्याही तर्कांवर घासून पाहिलं तरी सर्व केवळ अशक्य वाटत राहते. पण त्या सकाळीच काळरात्र उगवली हे खरे, मॅनहटन बेटावर माणसं विझली, जीवन विझलं हे खरे !

या घटनेवर लिहिल्या गेलेले अनेक लेख वाचले. या आक्रांताला जबाबदार मानल्या जाणाऱ्या संशयित अतिरेक्यांबद्दल वाचले, सीएनएन् ची वेबसाईट, बीबीसी, स्टारच्या बातम्या पाहिल्या, ऐकल्या. या घटनेवर भाष्य करणारी अनेक मत मतांतरे समजावून घ्यायचा प्रयत्न केला. पण मनातला प्रश्न प्रतिध्वनित होत रहातो, '' हे कसं घडलं..... आणि असं असेल तर काही खरं नाही हेच खरं !''

आवाज चढवला, शस्त्राचा धाक दाखवला की सर्व काही साधता येते असे तत्त्वज्ञान असणारे अतिरेकी, सामान्यांच्या जीवनाशी खेळ खेळणारे अतिरेकी एकीकडे आणि प्रगतीच्या नावाने शिंग फुंकणारे एकीकडे. मानवी संस्कृती नेमकी कोणत्या दिशेने चालली आहे ? दहशतवादाचा मुकाबला करू असे म्हणत राहणे हे सत्ता स्पर्धेतील तंत्र झाले आहे. बळी तो कान पिळी हा जंगलाचा कायदा आज जगभर पाळला जातोय आणि यात ससेहोलपट होत आहे ती सामान्य माणसांची. सारं काही अशांत आहे. क्षणभंगुर आहे ही भीती मनात बाळगत माणसं जगायला लागली की जीवनमूल्ये टिकू शकत नाहीत.

याही पार्श्वभूमीवर जाळलेल्या चितेच्या ठिकाणी एखादं रोपटं तरारावं, अशा बातम्या येत रहातात. सामान्य माणसांच्या मरणासाठी कोण प्रार्थना म्हणणार, शोकसभा घेणार.... पण जगभर अशा प्रार्थना झाल्या. रक्तदानासाठी कित्येक मैलांच्या रांगा अमेरिकेत लागल्या, मरता मरता हजारो जणांनी सेल फोन चा वापर करून आपल्या मनातले 'प्रिय' जवळच्या व्यक्तींच्या कानात सांगितले, डॉक्टर्स, नर्सेस, सोशल वर्कर्स.... सर्व अमेरिका दुःखाच्या या प्रसंगी धावून आली. अशा गोष्टी असतात म्हणून उगवणाऱ्या सूर्याला काही अर्थ असतो. प्रेताच्या टाळूवरचं लोणी खाणारे असतात, तसेच मूल्यांवर श्रद्धा असणारेही असतात. म्हणून जग चालू राहते.

काही खरं नाही, हेच खरं...... असं वाटता वाटता कुठंतरी हिरवं पान, हिरवा अंकुर अंकुरत असतो.



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक ११ / ऑक्टोबर २००१ किंमत रु. २० / -

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्टस,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | स्वप्नांविषयी | गजानन पळसुले-देसाई | ३ |
| २) | सन २०२०मधील ग्रंथालये | प्रतिभा कांबळे | ६ |
| ३) | रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग | विश्वनाथ शेंडे | ९ |
| ४) | पुस्तक परिचय - | | |
| | १) बिग इगोज् स्मॉल मेन | राम जेठमलानी | १३ |
| | २) Glimpses of Chemistry in Ancient and Medieval India | डॉ. कुलकर्णी<br>डॉ. विजय बेडेकर | १४ |
| ५) | कोवळी मने | सौ. वंदना प्रसादे | १६ |
| ६) | महाविद्यालयांची वार्षिके | प्रवीण गुरव | १८ |
| ७) | नी.गो. पंडितराव स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त भाषणे - कनिष्ठ गट | मंजिरी श्रीकांत पटवर्धन<br>आदित्य अरुण फडके | २१ |
| ८) | उध्वस्त जागतिक शांततेचा पहिला बळी- आजचा विद्यार्थी | प्रा. शिरीष लाटकर | २७ |
| ९) | एक उद्बोधक संवाद | ह.श्री. परांजपे | ३० |
| १०) | ग्रंथ प्रचारासाठी | सौ. अपर्णा काजरेकर | ३३ |
| ११) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३५ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही

# स्वप्नांविषयी

*'स्वप्न' हा एक सापेक्ष पण अतिशय काव्यात्म असू शकणारा असा विषय. प्रत्येकच माणूस स्वप्न पाहतो. काहींची खरी होतात, काहींची होत नाही. अशा ह्या स्वप्नांबद्दल हे थोडेसे प्रकट चिंतन. - संपादक*

मनी वसे ते स्वप्नी दिसे - फार लहानपणापासून आपण ऐकून असतो. 'स्वप्न' म्हणून तर आकर्षक असतात, गोंडस असतात. मोहवणारी असतात, भुलवणारी असतात तशीच भुरळ पाडणारी असतात. मन आणि खंबीर मनगट यांची युती करून कृतीला गती देऊन स्वप्नातील घटनांची प्राप्ती करुन घेणारे फार थोडेजण असतात. हजारो शास्त्रज्ञांना न उकलेले बेन्झीनच्या रचनेचे रेणुसूत्र केक्युले नावाच्या शास्त्रज्ञाला स्वप्नातच सुचले; असे म्हणतात. पण असा शास्त्रज्ञ विरळाच. सर्व सामान्य माणसांना अतृप्त राहणाऱ्या इच्छा, वासना, गोष्टी स्वप्नातच पूर्ण झालेल्या दिसतात.

मन मनास उमगत नाही - आधार कसा शोधावा
स्वप्नातील पदर धुक्याचा - हातास कसा लागावा

अशी व्यवहारात सगळ्यांचीच अवस्था असते. जगताना जीवनाच्या नाक्यानाक्यावर संघर्षाचा, संकटाचा अक्षरशः 'राडा' असतो. अशा भयाण वास्तवाच्या, कटु वास्तवाच्या रखरखाटातून काही काळ सुखाचे म्हणजे 'स्वप्न'. स्वप्न म्हणजे जे सत्यात येऊ शकणार नाही त्याची पूर्ती. शारीरिक -आर्थिक-मानसिक किंवा दैव, तकदीर, नियती यामुळे जे वास्तवात येऊ शकत नाही ते स्वप्नात पूर्ण झालेलं दिसतं. गाढ निद्रेत काही क्षण मनाला निखळ आनंद देणारा 'ट्रेलर' म्हणजेच स्वप्न. स्वतःच्या जीवनात पूर्ण वा तडीस न जाणाऱ्या गोष्टी लाभल्या आहेत असा दृष्टीभ्रम, मनोभ्रम देणाऱ्या चित्रपटाला 'स्वप्न' म्हणतात. आणि म्हणूनच तुम्हाला, मला सगळ्यानाच अपवाद वगळता 'स्वप्न' पहायला आवडतात.

'कौन बनेगा करोडोपती?' असं कोट्याधीश बनण्याचं स्वप्न उराशी बाळगून लाखो लोक म्हणूनच स्वप्नवेडे होतात. स्वप्नं तरी किती, किती प्रकारची असावीत? शाळेत, बोर्डात पहिला नंबर काढण्याचं स्वप्न विद्यार्थ्यांचं असू शकतं. एखाद्या नवथर युवकाला त्याच्या लाडक्या प्रेयसीसह कुठेतरी किनाऱ्यावरचे स्वप्नं पडेल, मग माधुरीपासून लारा दत्तपर्यंत किंवा अक्षय, ऋतिक, शाहरुख प्रेयसीला स्वप्नात दिसू शकतात. बंगला, गाडी, प्लॅट, श्रीमंत बनणे, बोर्डात येणे, खासदार वा जि.प.चा सदस्य बनणे, पदाधिकारी बनणे, स्वतःच पुस्तक वा संग्रह निघणे अशी कितीतरी व्यक्तीगत 'स्वप्नं' असू शकतात. स्वप्नं व्यक्तीगत असतात तशीच सामूहिक असू शकतात. उदा. भारतानं १०/१२ सुवर्णपदकं ऑलम्पिकला मिळवली हे स्वप्नं असू शकत. स्वप्नं काय काय प्रकारची असू शकतात याची यादी दिली तर फार मोठी जंत्रीच होईल. मी त्यातलं एक उदाहरण मुद्दाम देणार आहे. किस्सा आहे पु.लं. नी सांगितलेला. टेलरींग करणारा 'शिंपी' टेलरींगचं विद्यापीठ काढून आपण त्याचं कुलगुरुपद भूषवावचं असं स्वप्न बघत असतो. परंतु त्याला साध्या शर्टाची शिलाई जमत नसते. काही माणसं दिवसा पण असे भ्रमात असतात. त्यांची स्वप्नं म्हणजे 'दिवास्वप्नंच'. ऐन विशी-पंचविशीत एखाद्या M.A. झालेल्या युवकानं अधिकारी बनण्याचं स्वप्न बाळगलं तर ठीक आहे. परंतु डॉक्टर वा इंजिनीअर बनण्याची स्वप्नं त्याला पडली तर ती 'दिवास्वप्नेच' होत.

सर्वसाधारणतः स्वप्नांची व्याप्ती आपण पाहिली. पण माणसाला स्वप्नं का पडतात? शास्त्रज्ञांनी हजारो सिद्धांत मांडलेत. परंतु मानवी मनाची असमर्थता स्वप्नांमागे

असते. दुबळं शरीर, दुबळं मन, परिस्थितीजन्य अडचणी सामाजिक परिस्थिती, भौगोलिक वातावरण, अशा कितीतरी अडचणी मनातल्या स्वप्नांची राखरांगोळी करतात. प्रत्येकाच्या मनात एकेक स्वप्नं असतं. प्रत्येक गोष्ट, कृती आदर्श व्हावी असं प्रत्येकाला वाटत असतं. सर्वसामान्य 'भणंग' व्यक्ती, सडकछाप ते प्रियकर-प्रेयसी, तरुण-तरुणी, शास्त्रज्ञ, राजकारणी, पत्रकार, जीवनातल्या प्रत्येक घटकाकडे स्वप्नं असतात. प्रत्येकाने आपआपली स्वप्नं घट्ट मुठीत धरलेली असतात. पण तुम्ही एकदा का स्वप्नं पाहिलतं की त्याची समाप्तीही असते. नव्हे 'स्वप्न' पहायचं असेल तर ते संपल्यावर, झोप उडाल्यावर, डोळे उघडल्यावर स्वप्नभंगाच दुःख, धक्का, चटका सोसण्याचं बळ मनात हवं. नाहीतर स्वप्नं बघूच नये. पडणारी प्रत्येक स्वप्न माणसाला अपेक्षाभंगाचा धक्काच देतात. म्हणूनच म. गं. भावे एका कवितेत म्हणतात -

स्वप्नातल्या कळ्यांनो - उमलू नकाच केव्हा
गोडी अपूर्णतेची - लावील वेड जीवा

बिचाऱ्या मुक्या कळ्यांनो उमलू नका, वास्तवाच्या उन्हात करपून जाल. किंवा 'परीकथेतील राजकुमारा स्वप्नी माझ्या येशील का ? भाव दाटती मनी अनामिक अर्थ तयाला देशिल का? अशा गीतातही कवी मनातल्या अनामिक भावांना अर्थ स्वप्नातच द्यायला सांगतो. परंतु कीटस्, शेले यांसारख्या कवींनी स्वप्नांची गरज सांगितलीय. परंतु आमच्या कुसुमाग्रजांनी स्वप्नाची समाप्ती सांगितली.

काढ सखे गळ्यातील तुझे चांदण्यांचे हात
क्षितीजाच्या पलिकडे उभे दिवसाचे दूत

स्वप्नांत रंगून गेलेल्या प्रेयसीला किती वास्तववादी उपदेश आहे. उद्या सकाळी जर आपण असेच राहिलो तर लोक आपणाला वेडे म्हणतील. त्याच कवितेत पुढे ते म्हणतात -

होते म्हणू स्वप्न एक । एक रात्र पाहिलेले
होते म्हणू वेड एक । एक रात्र राहिलेले !

स्वप्नांची समाप्ती अशी असते. मनाला रितेपणा, अस्वस्थपणा देणारी, पण म्हणून स्वप्नं पहायचीच नाहीत का ? माणसं मरतात पण स्वप्नं मरत नाहीत. स्वप्नं असली तरच सत्यात ती उतरतात. जे तुमच्याजवळ आहे त्यातूनच, तुम्ही जेथे आहात तेथुनच, सुरुवात करा आणि प्रत्येकक्षणी अतृप्त राहत आव्हानांना भिडत रहा.

ज्वालांच्या पंखातून गगनाला भिडत रहा
प्राणांच्या दीप्तीतून क्षितीजाचे स्वप्न पहा

अशा आशावाद जपायला सांगणारा 'कार्व्हर' मनातला ध्येयवाद जागा करतो. अठरा वेळा निवडणुकीत हरुन राष्ट्राध्यक्ष होणारा लिंकन दरवेळी स्वप्नं पाहत होता. कोलंबसानंसुद्धा स्वप्नं पाहिलं, सिंकदर, शाहजहॉन या सगळ्यांनी स्वप्न पाहिलं. जगातल्या प्रत्येक यशस्वी माणसानं एकेक स्वप्नं पाहिलेलं असतं. अशी सोनेरी स्वप्नं मनात आणि ध्येयधुंद होऊन अखंड प्रयत्न, ध्यास, मेहनत केली जाते तेव्हाच स्वप्नं सत्यात उतरतात. ध्येय प्यायलेल्या माणसांनाही स्वप्नं पडतात आणि पेय प्यायलेल्या माणसांनाही स्वप्नं पडतात. कुणाला काय स्वप्नं पडावीत यासाठी तुमच्या निद्रेवर, मनावर कुणाचाच रिमोट नसतो. ज्यांची झोप शिवाजीमहाराजांसारखी असते त्यांची स्वप्नं स्वराज्यनिर्मितीची असतात तर सुस्तावलेल्या भाडोत्री मोगली सैनिकांची स्वप्ने वेगळी असतात. यातच सारं आलं.

आयुष्यात रखरखाट, भकासपणा नकोच असतो कुणाला. मग जर स्वप्नातून भासणारे-जाणवणारे भास-अभासच नाहीसे झाले तर जगणं हवंसं वाटेल का ? क्षितीजापार इंद्रधनु खोटं आहे हे माहीत असूनही भुलवतं ना आपणाला ? तळ्यात पडणारं चंद्राचं प्रतिबिंब तुम्हाआम्हाला हलवतं - डुलवतं. हजारो देशांत, प्रांतांत

हा चंद्र सगळीकडे परमेश्वरासारखा सर्वसाक्षी असतो, त्या चंद्रापेक्षा हा प्रतिबिंबातला, हलत्या पाण्याच्या रेषांनी-वर्तुळांनी जुळणारा-तुटणारा चंद्र तुम्हा आम्हाला मोहिनी घालतो. ज्ञानेश्वरांच्या 'इवल्याशा' पण गगनात जाणाऱ्या वेलुंच प्रत्यंतर इंद्रधनु देते. कैलास लेणं आभाळात कोरणारं, यक्ष-किन्नरांची नगरी साकार करणारं आकाश इंद्रधनु संपताच -ओकंबोकं भकास वाटतं. परंतु इंद्रधनुष्य दिसतानाच,..... हे सारं खोटं आहे, दृष्टीभ्रम आहे हे स्वप्न आहे असले विचार मनात येतात का ? आपण शास्त्रीय व्याख्यांच्या पल्याड गेलेलो असतो. आणि कुणाला तरी हे असं काही सुचत असेल तर माणसाला आगखी दोन शिंग व शेपटी नाही म्हणून माणूस म्हणायचं. म्हणून स्वप्नाबाबत मला इतकंच वाटतं -

असेच भवताली स्वप्नांच्या - दाट धुक्याने मज कवळावे

स्वप्नांच्या सरकत्या ढगांतून-इंद्राचे धनु सतत दिसावे.

**गजानन पळसुले-देसाई**
रायपाटण, जि.रत्नागिरी

• • •

## चंद्राबद्दल थोडसं

१) पृथ्वी-चंद्र अंतर (केंद्रामधील) सरासरी ३८३४०० कि. मी. किमान (उपभू) ३५६४१० कि. मी.कमाल (अपभू) ४०६६९७ कि. मी. प्रकाश सेकंद १.२८

२) चंद्र-पृथ्वी अंतर (पृष्ठभागामधील) सरासरी - ३७६२८४ कि. मी. किमान ३४८२९४ कि. मी., कमाल ३९८५८१ कि. मी.

३) पॅरलॅक्स-सरासरी ५७ कला ३ विकला किमान ५३ कला ५५ विकला कमाल ६१ कला आणि २८ विकला.

४) चंद्र-सावलीची लांबी (केंद्रापासून) -पृथ्वी उपसूर्यस्थानी असताना ३७३४३८ ते ३७३५६४ कि. मी. पृथ्वी अपसूर्यस्थानी असताना ३७९७०१ ते ३७९८२७ कि.मी.

५) कोनीय व्यास-सरासरी ३१ कला ५ विकला (३१'५'') किमान २१ कला २२ विकला (२९''२२''), कमाल ३३ कला ३१ विकला (३३'३१'')

६) परिवलन /परिभ्रमण काळ २७.३२ दिवस.

७) सांवसिक काळ (अमावस्या ते अमावस्या ) २९.५३ दिवस.

८) परिभ्रमण वेग १.०२ किमि /सेकंद

९) रेषीय व्यास ३४७६ किमी.

१०) चंद्रकक्षेचा आयनिक वृत्ताशी कोन ५'९'

११) विषवृत्ताचा आयनिक वृत्ताशी कोन १'३२'

१२) चंद्राच्या विषवृत्ताचा चंद्राच्या पातळीशी कोन -६'४१'

१३) वस्तुमान (पृथ्वीच्या वस्तुमानाच्या $^1/_{81}$ पट, $७.३५ \times १०^{२२}$ कि. ग्रॅम

१४) पृष्ठीय गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या ०.१६ पट

१५) घनता ३.३४ ग्रॅम घ.सें. मी.

१६) मुक्ती वेग २.३८ कि.मी. /सॅकंद

१७) कक्षेची विसध्यता ०.०५४

१८) पौर्णिमेच्या चंद्राची दृश्यप्रत-१२.७

१९) परावर्तन क्षमता - ७ टक्के

२०) गुरुत्वीय त्वरण (g)१.६३ मी/सेकंद

२१) कमाल तापमान - १२०' से.ग्रेट पेक्षा जास्त

२२) किमान तपमान -१५०' से.ग्रेट पेक्षा कमी

२३) चंद्र सावलीचा वेग ३३७० कि. मी. / ताशी

# सन २०२० मधील ग्रंथालये

*ग्रंथालयाच्या काम करण्याच्या पद्धतीवर इलेक्ट्रॉनिक माध्यम दिवसेंदिवस प्रभावी ठरत आहे. या तंत्रज्ञानाचा भविष्यातील वेध कसा असेल या विचाराने आज चक्रावून जायला होते. याच संदर्भात ग्रंथालय शास्त्राच्या एका विद्यार्थीनीने काही विचार मांडण्याचा केलेला हा प्रयत्न. - संपादक*

जसे जसे २०२० वर्ष वेगाने जवळ येत आहे, तसतसे २१व्या शतकातील जास्तीत जास्त घटित किंवा अघटित समस्यांविषयी लिहले जात आहे. वर्तमान आणि भविष्य यातील फरक जाणून घेणे व त्यावर विचार करणे हा मानवी व्यवहारातील एक भाग आहे. मागे वळून पहाता आपण कुठे होतो ? आणि आता कुठे पोहचलो आहोत? पुढील सहस्त्रकातील आरंभी भविष्यात आपण कुठे असू? या विचारांवर आपले लक्ष केंद्रित होते. मागे वळून पहाता, या प्रगतीची सुरुवात कशी काय झाली ? हे जर जाणण्याचा प्रयत्न केला तर असे दिसते -

**मुद्रण पूर्व युग :**

जुन्या मध्य युगातील लोकांच्या व्यवहारात त्यांचा जिवतपणा जाणवतो. धाग्यांनी वेगवेगळ्या अंतरावर लहानमोठ्या गाठी मारुन आपला गुप्त संदेश देण्याची पद्धत हे त्यांचे पहिले पाऊल होते. हे त्यांच्या दळणवळणाचे व्यवहारी आणि स्मरणशक्तीला चालना देणारं स्वरुप होते. असे दिसून येते. त्यांची दळणवळणाची कल्पना आणि भाषाशैली त्यांच्या तैलचित्रांवरुन दिसून येते. नंतर प्रत्येक गोष्ट चिन्ह आणि ठराविक आवाजाच्या सहाय्याने ते साकार करु लागले. नंतर वेगवेगळे लिखाण आणि साहित्य साकार होऊ लागले. चौदाव्या शतकापर्यंत चिकणमातीवर आणि ताडपत्रावर अक्षरे कोरुन त्यांनी प्रगती केली. जोहन गुटेन बर्ग (Johan Gutenberg) यांनी मुद्रण कलेचा शोध लावल्यामुळे १५व्या शतकात मुद्रण कलेचे युग सुरु झाले. सन १६५८ मध्ये "Orbus Pictus" प्रसिद्ध झाले आणि मानवी ज्ञानाच्या उत्क्रांतीची क्रिया उदयाला आली. तेच जगातील पहिले सचित्र पुस्तक होय. त्यानंतर लिखाण साहित्य आणि मुद्रण कलेत फेरबदल होत गेले.

**आता :**

सतराव्या शतकात औद्योगिक क्रांतीची लाट आली त्यामुळे मानवाच्या जीवनात आणि कृषी क्रांतीत अनाकलनीय बदल झाला. औद्योगिक क्रांतीने समाज बदलला आणि प्रबळ समाज निर्माण झाला. फक्त आर्थिक सहाय्यामुळे उत्पादन क्षमता वाढत नाही तर त्याला माहितीज्ञानाची गरज असते. औद्योगिकीकरणाने भांडवलाच्या शक्तीपेक्षा माहितीज्ञानाची शक्ती मोठ्या प्रमाणावर दिसून येऊ लागली. आधुनिकीकरणात पैसा (Money), सामग्री (Material) आणि मनुष्यबळ (Man) या तीन M ची आवश्यकता असते, तसेच माहिती तंत्रज्ञान हे त्या बरोबरीने चौथे साधन आहे.

आता माहितीज्ञानातील समाजामुळे ग्रंथालय रचना, कामे आणि इतर सर्व माध्यमे यात आमूलाग्र बदल होत आहेत. वाचकाच्या उपयोगाप्रमाणे साहित्य मिळणे, ते गोळा करणे आणि वाचकासाठी वेळेवर उपलब्ध करुन देणे हे ग्रंथालयाचे कार्य आहे. '' वाचकाचा वेळ वाचवावा'' या चौथ्या सूत्राप्रमाणे ती ग्रंथालयाची अंतर्गत महत्त्वाची बाब आहे. संगणकाचा वापर ग्रंथालयाच्या दैनंदिन कामात आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात केला तर ग्रंथालयाच्या कार्यक्षमतेत निश्चितच बदल होईल. संगणकावर माहिती साठवणे, माहिती उपलब्ध करुन देणे, संगणकावरील पटलावर वाचनीय स्वरुपात उपलब्ध करुन

देणे हे सगळे ग्रंथालय कार्यातील यांत्रिक घटक आहेत. आजच्या युगात संगणकावर Library Automation Information Retrieval, Management Information आणि Office Automation या प्रक्रिया वर्गीकृत करता येतात. या उपयोगांबरोबरच ग्रंथालये आपआपसात परस्पर संबंध ठेवू शकतात हा ग्रंथालयातील नेटवर्क निर्मितीचा लाख मोलाचा भाग आहे.

ग्रंथालयांतील नेटवर्क पद्धतीमुळे संदर्भ पुस्तकांचा आणि क्रमिक पुस्तकांच्या याद्यांची देवाण-घेवाण करता येते. Machine Readable Database मुळे संगणकाच्या सहाय्याने ग्रंथालयीन कार्यात वाढ झालेली आहे. हा बदल मानवी प्रगतीचा आणि तांत्रिक व्यवहाराच्या बदलाचा परिणाम आहे.

जगातील लाखो संस्था संगणकाच्या सहाय्याने जोडणे म्हणजे इंटरनेट होय. सतत माहितीचा data उपलब्ध करुन देणे हा संगणकातील Protocol Software चा उपयोग आहे. हा माहिती तंत्रज्ञानाचा महामार्ग आहे. आणि हे माहिती तंत्रज्ञानाचे मूळ उपयोग आहेत. संगणकातील Protocol Software चा उपयोग आहेत, FTTP, Email आणि Remote log-in-allow हे माहिती तंत्रज्ञानाचे मूळ उपयोग आहेत. Gopher, www आणि Archie allow हे ग्रंथालयाचे काम करण्यासाठी उपयुक्त आहेत. इंटरनेट हे नेटवर्कचे नेटवर्क समजले जाते. आज Mouse चे बटण दाबले की, वेगवेगळ्या प्रकारची माहिती जलदगतीने मिळविणे शक्य आहे. ग्रंथालयाची साधन सामग्री गोळा करणे. इतर कामे करणे, माहितीचा संग्रह करणे आणि ती वाचकांपर्यंत पोहचविणे या महत्वाच्या सेवा पुरविण्यासाठी संगणक हा महत्त्वाचा घटक आहे.

Online Information Service गोळा करणे हा आजच्या युगात ग्रंथालयाच्या कामाचा महत्त्वाचा भाग आहे. तसेच ग्रंथालय परिसरातील नेटवर्कसाठी CD-ROM चा उपयोग करतात. या संदर्भातील ग्रंथालयीन कामाचा भाग विचारात घेतला असता ग्रंथपाल माहिती पुरविण्यापासून माहितीचा उपयोग घेण्यापर्यंत कामे करीत असतात.

आपल्या देशातील बऱ्याचशा ग्रंथालयांनी Library Automation सुरु केलेले आहे. ग्रंथालय नेटवर्कींग Online Services, email सेवा ह्या आपल्या देशातील मोठमोठ्या शहरांमधून सेवा उपलब्ध आहेत. Resource Sharing हे भविष्यातील अत्यावश्यक कार्य झालेले आहे. आपल्या देशातील आर्थिक बदल आणि विनिमयाचे बदलते दर यामुळे यांची ह्या घटकेला गरज आहे.

### भविष्यात

ग्रंथालयांच्या माहिती गोळा करण्यात मोठ्या प्रमाणावर आणि आमूलाग्र बदल होत आहेत. या बदलांची प्रमुख कारणे म्हणजे इंटरनेटचा उदय आणि www तंत्रज्ञानाची प्रगती होय. यामुळे जुने नियम बदलले आणि नवीन विज्ञानसंबंधी माहितीज्ञान गोळा होऊ लागले. मागील ३० वर्षांतील उत्क्रांतीविषयक कल आणि आताच्या माहितीज्ञानातील जोर व महत्त्व यांच्यात परस्पर विरोधी संबंध आहे.

या बदलांचे प्रमाण आणि वेग स्पष्ट करणे तसे अवघड आहे.

भविष्यात नेटवर्क माहितीज्ञानात ग्रंथालये किती प्रमाणावर कामे करतात यावर ग्रंथालयांचे कार्य अवलंबून असेल. कारण ग्रंथालये ही नेटवर्क तंत्रज्ञाने फक्त उपलब्ध करुन देत नाहीत तर ते माहितीज्ञानाचा फैलाव करतात. लेखनाच्या सत्यप्रतिसाठी काही अधिकार असतात. त्यांचा उपयोग कसा करावा या बाबतीत ग्रंथालये मदत करतात. ग्रंथपाल इलेक्ट्रानिक माध्यमातील माहिती देण्यात

वाकवगार असतात. आणि माहिती तंत्रज्ञानातील माहिती पुरविण्यातील बोलणी करण्यास तयार असतात. या तंत्रज्ञानामुळे आता आणि नंतर माहिती तंत्रज्ञान आपल्याला आपल्या कार्यालयात बघता येईल. त्या कॉपी आपल्याला संगणकाच्या पटलावर निरखून पहाता येतील. किंवा पेपरवर प्रिंट करुन घेता येतील. त्यामुळे ती माहिती उपभोक्त्याला पुरविता येते. उपभोक्ता स्वतः ग्रंथालयात येऊन ती माहिती मिळवू शकतो. इलेक्ट्रानिक माहितीची साधने उपलब्ध झाली तरी उपभोक्त्याची प्रिंटीग सामग्री संपादन करण्यासाठी खालील पायऱ्या वापरता येतील.

- CD-ROM सह ग्रंथालयीन इतर सामग्री गोळा करणे आणि त्यांचे व्यवस्थितपणे व्यवस्थापन करणे.

नेटवर्कसह इलेक्ट्रॉनिक माहिती तंत्रज्ञानाच्या साधन सामग्रीची प्रक्रिया करणे.

ग्रंथालयीन साधनसामग्री गोळा करणे. महाविद्यालय परिसरातील इलेक्ट्रॉनिक साधनांची निर्मिती करणे. अशा प्रकारे माहिती तंत्रज्ञानाचा फैलाव करणे.

माहिती तंत्रज्ञानाच्या सुरुवातीपासून माहिती ज्ञानाच्या On line database वर मिळणाऱ्या ज्ञानाच्या चौकशीचे सेवा दालन सुरु करणे. अशी कामे ग्रंथालयांना करावी लागतील.

भविष्यातील ज्ञानाधिष्ठित समजात ग्रंथालय व्यवहाराला वेगळेच परिणाम लाभणार आहे. किंबहुना २०२० सालातील बदलत्या ग्रंथालय वास्तवाकडे प्रवास करण्यास आजच्या ग्रंथालय व्यवहारांनी सुरुवात केली आहे. असे आज आपल्या लक्षात येते.

**प्रतिभा कांबळे**
कांजूरमार्ग (पू.), मुंबई ८२.

•••

## परिसर महाविद्यालयांचा

* जून १९६१ साली विद्या प्रसारक मंडळाने कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सुरु केले.

* जून १९७५ साली एकत्रित महाविद्यालयाचे विभाजन होऊन बांदोडकर विज्ञान महाविद्यालय स्वतंत्रपणे काम करु लागले.

* परिसरात आज कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालया बरोबर तंत्रनिकेतन, विधी महाविद्यालये व व्यवस्थापन विभाग विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

* परिसरातील रस्ते, प्रशस्त कँटीन व थोरलेबाजीराव पेशवे सभागृह या मुळे परिसर अधिक देखणा व आकर्षक झाला आहे.

# रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग

*'दिशा' च्या मागील अंकातील आवाहनास आमचे जुने स्नेही श्रीयुत 'विश्वनाथ शेंडे' यांनी आपले अनुभव लेखरुपाने लिहून पाठवून प्रतिसाद दिला. तो लेख येथे देत आहोत. - संपादक*

**ग्रंथालयीन संदर्भ सेवा-**

भारतासारख्या महान देशात ज्ञानियांचे राजे होऊन गेले. ऋग्वेद, यजुर्वेद आदी वेद ग्रंथ ब्राह्मणग्रंथासारखे यज्ञविधींवरचे ग्रंथ, गीता, उपनिषदांसारखे तत्त्वज्ञानपर चिंतन ग्रंथ, पुराणे, विविध पूजा, कथा, कर्मकांड, ज्योतिषांवरचे ग्रंथ, व्याकरण, साहित्य, नाटक, काव्य इ. ग्रंथ प्राचीन भारताचे ज्ञानभांडार आहे.

गुरु शिष्य परंपरेने हे ज्ञानभांडार एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पाठांतर स्वरुपात अखंड व अचूक राहिले. कागदाचा शोध, छपाईतील क्रांती झाल्यावर ही गुरु शिष्य परंपरा हळूहळू लुप्त होऊ लागली. गुरुकुले नष्ट झाली. गुरुची पूर्ण वेळ उपलब्धता व शिष्यांचे पूर्ण वेळ अध्ययन परंपरा नाहीशी झाली.

अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांती, दळवळणाच्या साधनांतील क्रांती, लोकसंख्या वाढ, शहरीकरण अशा अनेक कारणांनी माणसाचे स्थैर्य हरपले. मेकॉलेच्या शिक्षणपद्धतीने विद्वानांच्या परंपरेवर घाला घातला. सरकारी बाबू तयार करण्याचे कारखाने म्हणून विद्यालयांची, शिक्षणपद्धतींची रचना झाली. गुरु पगारी नोकर झाला. तर शिष्य ज्ञानार्थी होण्याऐवजी परीक्षार्थी झाला.

शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणामुळे, जागतिकीकरणामुळे प्राचीन शिक्षणपद्धतीचा ढाचाच संपूर्णपणे बदलून गेला. शिक्षक व्याख्याते यांची चलती सुरु झाली. आपल्यापेक्षा विद्यार्थ्याने अधिक ज्ञानसंपन्न व्हावे हा गुरुचा अट्टाहास संपला. परीक्षार्थी विद्यार्थी व गुरु यांचा संवाद राहिला नाही. गुरु शिष्यांचे परस्पर संबंध परीक्षेचे गुण व शिकवणीचे मूल्य या पुरतेच मर्यादित राहिले.

ज्ञानशाखांचा प्रचंड विस्तार ही आधुनिक काळातील विशेष उल्लेखनीय गोष्ट आहे. प्रत्येक शाखेचे विशेष शिक्षित लोक ही काळाची गरज ठरली. छपाईमुळे ग्रंथसंपन्नता येऊ लागली. अनेक उत्तमोत्तम ग्रंथ गेल्या दोनशे वर्षांत छापले गेले. ज्ञानशाखांच्या विस्ताराबरोबर एका शिक्षकाच्या ज्ञानाला, बुद्धीला मर्यादा पडल्या.

ग्रंथ हे गुरु झाले व ग्रंथालये ही आधुनिक गुरुकुले बनली. ग्रंथालयात जावे, ग्रंथ पहावा व आपले समाधान करुन घ्यावे हा सर्वमान्य पर्याय झाला. आणि यामुळेच ग्रंथालयांचे, ग्रंथपालांचे व ग्रंथालयात मिळणाऱ्या सेवेचे महत्त्व वाढले. ग्रंथपालन हे एक स्वतःसिद्ध शास्त्र झाले. ग्रंथालये व त्यात मिळणारी संदर्भ सेवा यांना या शतकात महत्त्व प्राप्त झाले.

ग्रंथपालाचे कौशल्य ग्रंथ रक्षणात नसून ग्रंथ संदर्भ सांगण्यात व अनेक तऱ्हेचे ज्ञान व वाचकापर्यंत पोचवण्यात आहे. असे आज मानले जाते.

ग्रंथालयात संदर्भासाठी आलेल्या वाचकाला योग्य मार्गदर्शन करणे हे ग्रंथपालाचे विशेष व महत्त्वाचे काम आहे. अशा वेळी संबंधित विषयावरील ग्रंथ, शोधनिबंध, मासिके अगर वर्तमानपत्रातील कात्रणे याचा शोध घेणे आवश्यक असते.

आजच्या ग्रंथपालाला निश्चितपणे प्राचीन गुरुची जागा घ्यावी लागणार आहे. ग्रंथपाल हा सर्वज्ञ असावा अगर असेल अशी वाचकांची अपेक्षा असते. आणि यासाठी प्रथमतः ग्रंथपाल स्वतः अधाशी वाचक असावा लागतो. ज्ञानसंग्राहक बुद्धी असावी लागते. उत्तम स्मृती असावी लागते. त्याचबरोबर सार्वजनिक ठिकाणी काम करत असल्याने स्वभावात नम्रता, गोडवा, दुसऱ्याला मदत करण्याची इच्छा, व मनुष्य स्वभावाची अचूक जाण हे गुण त्याच्याजवळ असावे लागतात. आकर्षक व्यक्तिमत्त्व, हसतमुख राहण्याचे कौशल्य, व सतत कामात, व्यवस्थापनात व्यस्त राहण्याची सवय हे गुणही आवश्यक आहेत. वाचनालयातील स्वच्छता, टापटीप या गोष्टींकडेही त्याने लक्ष द्यावे लागते. थोडक्यात तो 'मास्टर ऑफ ऑल' असावा लागतो.

जिज्ञासू वाचकांचे निरनिराळे प्रकार असतात. खरा जिज्ञासू, नुसताच शंकेखोर, काहीतरी शंका म्हणून शंका, किंवा चर्चेला विषय निरर्थक वेळ काढणारा किंवा गप्पा मारण्यासाठी उत्सुक असे हे वाचकांचे किंवा संदर्भ शोधकांचे प्रकार असतात. याचे ज्ञान ग्रंथपालाला असावे लागते. अनेक वेळा नम्रतेने नकार देण्याचे त्याला जमले पाहिजे. नाहीतर ग्रंथपालाचे काम बाजूला राहून येणाऱ्या जाणाऱ्या वाचकांच्या बाजाराचे स्वरुप ग्रंथलयाला येण्याची शक्यता असते.

संदर्भ सेवा हे ग्रंथपालाचे एक महत्त्वाचे अंग आहे असे मानले तर ही संदर्भ सेवा कोणत्या पद्धतीने वाचकाला देता येते याचा विचार करु.

ग्रंथ हे पहिले साधन आहे. ग्रंथालयात ग्रंथ कसे ठेवावेत हे त्या त्या ग्रंथालयाच्या ग्रंथ संख्येवर तसेच विषयांवर अवलंबून असते. दाखल क्रमांकानुसार, विषयानुसार द्विबिंदु पद्धतीने ही पुस्तके ठेवली जातात. एका ग्रंथात अनेक विषय असले तरी विषयवार पुस्तक रचनेनुसार नेमका विषय सापडत नाही. एका संतचरित्राचे ग्रंथात 'मनाच्या श्लोकांचे' सुमारे १००-१२५ पाने सार्थ विवरण मिळाले. या संबंधी मी पुढे लिहिणारच आहे. पण यातील महत्त्वाचा मुद्दा असा की हा ग्रंथ चरित्र ग्रंथ म्हणून बघण्याचे किंवा मनाच्या श्लोकांच्या संदर्भात संदर्भ ग्रंथ म्हणून पाहावयाचे राहून जाईल व वाचकाची निराशा होईल. या साठी ग्रंथपालाच्या वैयक्तिक वाचनाचा, निरीक्षणाचा स्मृतीचा उपयोग होतो.

वर्तमानपत्रातील बातम्या, लेख यांची कात्रणे, निरनिराळ्या मासिकातील अभ्यासपूर्ण लेख यांची कात्रणे हाही संदर्भ साहित्याचा महत्त्वपूर्ण घटक आहे. वर्तमानपत्रातील अनेक विषयांपैकी काय ठेवावे काय ठेऊ नये या बाबत निकष लावणे हे जिकिरीचे व अवघड काम असते. आपल्या वाचकवर्गाच्या गरजांचा अचूक अंदाज असणे हा ग्रंथपालाच्या कार्याचा एक भाग आहे.

तिसरे साधन म्हणजे संगणकाचा वापर. आज संगणकाइतके प्रभावी साधन ग्रंथपालाचे हाती आले आहे. यामुळे संदर्भ सेवेत मोठी क्रांती घडून आली आहे. संदर्भ शोधण्याच्या वेळात खूपच बचत झाली आहे व स्मृतीवरचा ताण संगणकाच्या 'मेमरीने' घेतला आहे. ग्रंथासंबंधी 'डेटा शीट' करुन त्यात असलेले विषय 'की वर्डस्' म्हणून दिले की कोणताही विषय क्षणार्धात ग्रंथापालापुढे हजर होतो. तालिका, सूची इ. हाताने बनविण्याचे किचकट व कष्टदायक काम आता अगदी सुलभ झाले आहे. 'लोकेशन कोड' मुळे पुस्तक नेमके कुठे आहे हे ही समजणे सोपे झाले आहे. या संगणकीकरणावर हळूहळू जास्त अवलंबून राहिल्यास ग्रंथपालाची ग्रंथांशी असलेली जवळीक व संदर्भ शोधण्याची बौद्धिक, मानसिक क्षमता, स्मृतीची देणगी वाढविण्याची गरज ह्या गोष्टी नष्ट होण्याचा धोका आहे.

थोडक्यात संदर्भ सेवा ही आजच्या माहिती स्फोटाच्या जगात अत्यंत गरजेची बाब आहे. ग्रंथपाल व

वाचक यांच्यातील जवळीक ही संदर्भ सेवेचा दर्जा ठरविते. त्यासाठी ग्रंथपाल व जिज्ञासू वाचक यांनी एकमेकांच्या गरजा, अडचणी समजून घेणे जरूरीचे आहे. यावरच संदर्भ सेवेच्या परिणामकारकतेचे भवितव्य अवलंबून आहे.

हे झाले संदर्भ सेवेसंबंधी तात्विक विवेचन. परंतु प्रत्यक्ष संदर्भ शोधण्याचे काम हे रोजचे आव्हानच असते. म्हणूनच लेखाच्या शीर्षकात म्हटले आहे 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' अर्थात् हे युद्ध बौद्धिक व मानसिक पातळीवरचे असते.

ज्यावेळी एखादा वाचक संदर्भासाठी येतो त्यावेळी त्याने, हा संदर्भ सहजपणे मिळवण्याचा बाहेर प्रयत्न केलेला असतो. बाहेरच्या चार लोकांकडे चौकशी केलेली असते. हा संदर्भ बाहेर सहजपणे मिळत नाही ही खात्री झाल्यावरच तो ग्रंथालयाची पायरी चढतो.

ज्या ग्रंथपालांचे वाचन कमी किंवा केवळ नोकरीचे साधन एवढीच ग्रंथालयासंबंधी आस्था, किंवा बहुश्रुतपणा कमी, असे ग्रंथपाल संदर्भ शोधण्याचे कष्ट घेण्यापेक्षा 'नाहीबुवा सहज सांगता येणार' म्हणून वाचकाला नम्रपणे परत पाठवतो.

परंतु तुमचा शोध 'हे आता माझे काम आहे' अशा जिद्दीने व प्रामाणिकपणे ग्रंथपाल संदर्भ शोधू लागतो, तेव्हाच त्याच्या बौद्धिक व मानसिक ओढाताणीला सुरुवात होते. संदर्भ सहज सापडला तर संदर्भ शोधक व ग्रंथपाल या दोघांना आनंदच.

' दोन चार दिवसांनी या. आपल्याला हवा तो संदर्भ शोधून ठेवतो.' असे ग्रंथपालाने मोघम आश्वासन दिल्यावर, ज्याला संदर्भाची खरोखर जरुर आहे तो चार दिवसांनी परत येतो. उगीचच प्रश्न असणारा माणूस सहसा परत येत नाही असा माझा अनुभव आहे. ज्या संदर्भ शोधकाला खरोखरची निकड असते तो पुन्हापुन्हा येत राहतो व ग्रंथपालाचा पिच्छा सोडत नाही. ग्रंथपालालही संदर्भ शोध चालू ठेवावा लागतो. संदर्भ मिळेपर्यंत त्याला चैन पडत नाही. इतर कामे चालू असतानाही न सापडलेला संदर्भ, हा न सापडलेल्या वस्तूप्रमाणे बेचैन करतो.

मला एक प्रसंग आठवतोय. माझ्याकडे एक ज्येष्ठ लेखक नियमित येऊन वाचनालयात वाचन करतात. कधी काही चर्चा करतात. त्यांचे अभ्यासाचे, लेखनाचे विषयहि विविध आहेत. अचानक एक दिवस त्यांनी 'वयम् अमृतस्य पुत्राः।' हे स्वामी विवेकानंदांचे वचन नेमक्या कोणत्या प्राचीन ग्रंथातले आहे याबद्दल संदर्भ मागितला. माझ्या वाचनात, हे वचन एका पुस्तकाचे शीर्षक असल्याचे होते. ते मी त्यांना सांगितले. ज्या लेखकाचे हे पुस्तकाचे शीर्षक होते त्यांच्याकडेही त्यांनी चौकशी केली होती. त्यांनाही तपशील माहीत नव्हता. 'चार दोन दिवसांत पाहू' म्हणून मी स्वस्थ झालो. पुन्हा चार दिवसांनी त्यांनी विचारले 'काय हो संदर्भ मिळाला का?' मग मात्र मी शोध गंभीरतेने सुरु केला. माझे रोजचे काम मागे पडू लागले. एका वाक्यासाठी चारी वेद, वेदांचे उपग्रंथ, उपनिषदे यांच्यावर बारीक नजर टाकणे आवश्यक झाले. अनेक पुस्तके चाळूनही संदर्भ मिळेना. अचानक एके दिवशी पुस्तके चाळत असताना ऋग्वेदातील अकारविल्हे सूची मिळाली. आणि आवश्यक तो संदर्भ मिळाला. परंतु मूळ वाक्य आणि ऋग्वेदातील वाक्य जमेना. यावर चर्चा होऊन ऋग्वेदातील शब्दच मागे पुढे करुन सोईनुसार वाक्य बनविले गेले होते असे दिसून आले. यावर चर्चा होऊन इतर विद्वानांनी दुजोरा दिला तेव्हा हा शोध संपला.

संदर्भ मिळेपर्यंत ग्रंथपालाला चैन नसते. संदर्भ शोधात जसजसे तुम्ही एकाग्र होत जाता तुमच्या अंतर्मनातील एक अदृश्य शक्ती तीव्र होत जाते व सहज स्फुरणाच्या इंटुशनच्या रुपाने शोधात मदत करतात किंवा तुम्हाला त्या संदर्भाजवळ नेऊन सोडते. हा अनुभव आपण

हरवलेली वस्तू शोधतांना सुद्धा घेतो. हा अनुभव वेगळ्या पातळीवरचा असतो. जसजसे या कामात तुम्ही स्वतःला झोकून द्याल, विचारशक्ती तीव्र कराल तसेतसे संदर्भ शोधण्याचे काम सोपे होऊ लागते. हा माझा इतक्या वर्षांचा अनुभव आहे.

चरित्र ग्रंथात सापडलेल्या 'मनाच्या श्लोकां'च्या सार्थ विवरणाचा उल्लेख मी वर केला आहे. असे सार्थ विवरण कुठे मिळेल ही संशोधकांची मागणी होती. या संदर्भातील पुस्तके समाधानकारक नव्हती. अंतर्मनात याविषयी तीव्र चिंतन चालू असता एक दिवस पुस्तकांच्या एका कपाटाजवळ सहज पुस्तके चाळत होतो. त्यातील एक पुस्तक संत चरित्र होते. पुस्तक चांगले जाडजूड होते. संतही अलिकडच्या काळातले होते. म्हणून पुस्तक जाग्यावर टाकणार ऐवढ्यात ते पुस्तक चाळून तरी पहावे असे वाटले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जो संदर्भ मे गेले अनेक दिवस शोधत होतो त्या मनाच्या श्लोकांचा सार्थ विवरणाची सुमारे शंभर ते सव्वाशे पाने विवरण मिळाले.

शोध संपल्यामुळे हलके वाटले. वाचकाच्या आनंदाला पारावार नव्हता. हाच या व्यवसायातील ग्रंथपालाचा आनंदाचा क्षण !

**विश्वनाथ शेंडे**

दूरध्वनी : ५३३ ०२८३ (घर)
प्राच्य विद्या संस्था, ठाणे.
दूरध्वनी: ५३८ ८३५८
ठाणे.

•••

## अधिक मासाविषयी माहिती

आपल्या भारतातील कालगणेनेच्या पद्धतीत अधिक मास हा प्रकार असतो. याला मलमास, पुरुषोत्म मास आणि महाराष्ट्रात धोंडामास असेही म्हणतात.

चांद्र वर्ष व सौर वर्ष यांचा मेळ घालण्यासाठी सरासरी ३२ किंवा ३३ चंद्रमासांनंतर चांद्रवर्षात जो एक अधिक महिना धरावा लागतो त्याला अधिक मास म्हणतात. सामान्यतः प्रत्येक चंद्रमासात एक सौर संक्रांती होत असते. ज्या मासात अशी सौर संक्रांती नसते तो अधिक मास मानतात. आणि त्या पुढचा महिना निज म्हणजे मुख्य महिना मानतात.

चैत्र, ज्येष्ठ व श्रावण हे १२ वर्षांनी, आषाढ १८ वर्षांनी व भाद्रपद २४ वर्षांनी, अश्वीन १४१ वर्षांनी व कार्तिक ७०० वर्षांनी अधिक मास होतो. भाद्रपदापर्यंतच्या मासांनाच अधिक मास म्हणतात. अश्वीन व कार्तिक अधिक आले तर त्यांस तसे म्हणत नाहीत. ज्या वर्षी अश्वीन अधिक होतो त्या वर्षी पौष क्षयमास होतो. अशा वेळी दोन प्रहरांपर्यंत मार्गशीर्ष व दोन प्रहरांनंतर पौष मानून दोन्ही महिन्यांची धर्मकृत्ये एकाच महिन्यात करतात. या जोडमासाला संर्प असे म्हणतात. कार्तिक पुढील चार महिने अधिक मास होत नाहीत.

चांद्र मास, सौर संक्रांत हा कळण्यास अवघड विषय आहे. हा विषय साध्या भाषेत सांगण्याचा तर, सौर वर्षाचे दिवस सुमारे ३६५ असतात तर चंद्रामासांचे दिवस वर्षात ३५४ च भरतात. त्यामुळे दरवर्षी चांद्र वर्ष व सौर वर्ष यात १२ दिवसांचा फरक असतो. तो फरक भरुन काढून दोन्ही वर्षे बरोबरीने रहावीत म्हणून दर ३ वर्षांनी अधिक मास धरला जातो. युरोपीयन पंडीतांचे म्हणण्याप्रमाणे भारताचे अधिकमास मानण्याची पद्धत इ.स. पूर्व १५०० वर्षांपासूनची असावी तर भारतीय पंडित शं.बा. जोशी यांच्या म्हणण्याप्रमाणे अधिकमास धरण्याची पद्धत इ.स. पूर्व सुमारे ५००० वर्षांची असवी.

# बिग इगोज् , स्मॉल मेन - राम जेठमलानी यांचे वाचनीय पुस्तक

**पुस्तक परिचय - १**

राम जेठमलानी हे या ना त्या कारणाने कायम प्रसिद्धीच्या झोतात रहाण्यामध्ये यशस्वी ठरलेले आणि या ना त्या कारणाने कायम वादग्रस्त ठरलेले कायदेपंडित म्हणून सर्वांना परिचित असे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांनी अलीकडेच 'बिग इगोज्, स्मॉल मेन' हे पुस्तक लिहून पुन्हा एक वादाचा मुद्दा ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न केला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस ने या मूळ इंग्रजीत असणाऱ्या पुस्तकाचा श्री. माधव मोर्डेकर यांनी याच नावाने केलेला अनुवाद मराठीत पुस्तकरूपाने आणला आहे.

कायद्याच्या त्यांच्या अभ्यास विषयाबरोबरच स्वातंत्र्योत्तर काळातील राजकारणाचा जेठमलानींचा व्यासंग मोठा आहे. केवळ अभ्यास व व्यासंगच नाही तर सक्रिय राजकारणातही त्याना रस आहे. यातूनच केंद्रीय मंत्रीमंडळामध्ये मंत्रीपद भूषविण्याची संधी त्यांना मिळाली. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना कायदा मंत्री केले.

परंतु भारताच्या मुख्यन्यायाधीशांनी सरकारच्या विरोधात परंतु जेठमलानींच्या रोखाने आक्रमक अभिप्राय व्यक्त करण्याचे व त्या अभिप्रायांना राम जेठमलानींनी प्रत्युत्तर देण्याचे निमित्त घडले आणि वाजपेयी यांना जेठमलानींनी राजीनामा द्यावा असे सुचवावे लागले. लोकशाही वरील निष्ठेमुळे जेठमलानींनी राजीनामा दिला खरा, पण न्यायसंस्था आणि सरकार यांच्यातील संबंधांमध्ये निर्माण झालेल्या बिघारामुळे ते समूळ अस्वस्थ झाले. कारस्थानी दुष्ट प्रवृत्तींनी राजकीय क्षेत्र कसे पोखरले आहे या विचाराने ते अस्वस्थ झाले व एकूणच लोकशाही शासन व न्याय संस्था यांच्यातील संबंधांचा विचार सुद्धा झाला. काय घडले, ते घडण्यात माणसांचे अहंभाव कसे कारणीभूत होते याचा सखोल, इतिहासाच्या दाखल्यांसह त्यांनी अभ्यास केला व त्यातूनच हे पुस्तक लिहिले गेले.

एकूण दहा प्रकरणात हा विषय व त्याच्या इतर बाजू त्यांनी मांडल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश डॉ. आदर्श सेन आनंद यांच्या संदर्भातील व त्या अनुषंगाने सरकार व न्यायसंस्था यांच्या संदर्भातील माहितीने पहिले प्रकरण सुरु होते. डॉ. आनंद यांच्याशी मतभेद होऊनही जेठमलानी त्यांच्याविषयी अतिशय आदराने लिहितात हे विशेष आहे. पुढील प्रकरणांमधून पुस्तकातील प्रतिपाद्य विषय व त्या अनुषंगाने केलेला विचार मांडताना स्वतःच्या कारकीर्दीतील अनुभव, स्वतःचा अभ्यास आणि इतिहासातील दाखले ते देताता '' मुख्य न्यायाधीशांबरोबर माझा उडालेला खटका एका परीने अनपेक्षित होता.'' (पृ. ३३) या विधानातील अनपेक्षितपणाचा आणि डॉ. आनंद यांचे व आपले अनेक वर्षांतील संबंध सौहार्दपूर्णच होते या बाबीचा उल्लेख अनेकदा येतो.

शासनसंस्था व न्यानसंस्था यांच्यातील संबंध, कर्तव्य बुद्धीने काम करणाऱ्या मंत्र्यांविरुद्ध वा लोक प्रतिनिधींविरुद्ध केली जाणारी कट कारस्थाने, त्यांच्या कामामध्ये निर्माण केली जाणारे अडथळे यावरल मराठीत फारशी चांगली पुस्तके नाहीत. त्या दृष्टीने आत्मनिवेदनावर असले तरी या पुस्तकात येणारे विवेचन हे न्याय आणि कायदा क्षेत्रामधील अभ्यासक, कार्यकर्ते यांच्यादृष्टीने उद्बोधक ठरु शकेल असे आहे. राजकीय विचारप्रवाहांमधील प्रदूषण, कटकारस्थाने, विकृत वळणे यांचे अनेक संदर्भ या पुस्तकातून समोर येतात.

या पुस्तकाला फली एस्. नरिमन यांनी परिचयवजा छोटीशी प्रस्तावना आहे. त्या प्रस्तावनेत त्यांनी शेवटी केलेले विधान अतिशय खरे आहे. ते म्हणतात,' या

पुस्तकासाठी रामने निवडलेले शीर्षक चिथावणीखोर आहे'' मोठा अहं असणारी(पण) छोटी माणसे शासन संस्था व न्याय संस्थेत आहेत. स्वतःचा अहं गोंजारण्यात ही माणसे धन्यता मानतात, पण ही असतात मात्र लहान ! याबाबत जेठमलानींनी केलेले मूल्यमापन वास्तव ठरेल असेच आहे. पण ते स्वतःही अहंमन्य आहेत याची पुस्तक वाचताना अनेकदा जाणीव होते. म्हणूनच नरिमन पुढे जे विधान करतात ते महत्त्वाचे आहे.'' त्याच्यापाशी (रामपाशी) एक भला मोठा अहं आहे'' राज्यसभेत केलेला खुलासा (पृ.९७) या प्रकरणात तर हे प्रकर्षाने जाणवते. मात्र एक खरे की अहंमान्यता असली तरी जेठमलानींचा कायद्याचा अभ्यास, राजकारणाची जाण, माहितीचा सर्वसामान्यांना असणारा हक्क याबाबत त्यांनी मांडलेली मते ही महत्त्वाची आहेत. मंत्रीपदाचा निष्ठेने, कर्तव्यबुद्धीने वापर करूनही असा अनुभव यावा यामुळे त्यांचा 'इगो' दुखावला गेला आहे. अन्यथा अधिक तटस्थ राहून हा विषय मांडणे त्यांना शक्य झालेही असते.

मूळ पुस्तक इंग्रजीत आहे. परंतु त्याचे मराठीत भाषांतर अतिशय योग्य व चांगले जमले आहे. भाषांतराबाबत एक अपेक्षा अशी असते की भाषांतरित मजकूर भाषांतरित आहे असे वाटू नये, त्याच भाषेत आहे असे वाटावे. सदर पुस्तकातील मोर्डेकर यांचे भाषांतर ही अपेक्षा पूर्ण करते. त्यांच्या भाषेतील ओघ, सुसंगतपणा व शैली यामुळे पुस्तक वाचनीय झाले आहे. मुखपृष्ठावर स्वतः श्री. राम जेठमलानी यांचे छायाचित्र आहे.

---

बिग इगोज्, स्मॉल मेन - राम जेठमलानी
अनुवाद - माधव मोर्डेकर
पुणे, मेहता पब्लिशिंग हाऊस, २००१
पृष्ठे ११७ मूल्य रु. ८०/- फक्त
आंतरराष्ट्रीय प्रमाणितक्रमांक - 81-7766-177-9

पुस्तक परिचय - २

## रसायन शास्त्र अभ्यासकांच्या दृष्टीने महत्त्वाचे पुस्तक

ठाण्यातील प्राच्य विद्या अभ्यास संस्था या संस्थेतर्फे पौर्वात्य इतिहास, संस्कृती आणि परंपरांच्या संदर्भात अनेक महत्त्वाच्या विषयांमधील संशोधनास प्रेरणा देणारे साहित्य, शोध निबंध वा पुस्तकांच्या रूपाने उपलब्ध करून दिले जाते. विविध परिषदा, कार्यक्रम, संमेलने यांच्या निमित्ताने निर्माण होणारे हे साहित्य हा संशोधन साहित्यातील महत्त्वाची भर आहे. जुलै २००१ मध्ये मुंबईत ३३वे आंतरराष्ट्रीय रसायन शास्त्र ऑलिम्पियाडच्या निमित्ताने 'ग्लिम्पसेस ऑफ केमेस्ट्री इन एनशन्ट अँड मेडिव्हिल इंडिया' (प्राचीन व मध्ययुगीन भारतातील रसायन शास्त्राची तोंड ओळख) हे डॉ. आर्. पी. कुलकर्णी व ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे माननीय अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे हे पुस्तक ठाण्याच्या या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेने प्रकाशित केले आहे. पुस्तकाच्या प्रास्ताविकात माननीय डॉ. विजय बेडेकर यांनी पुस्तक निर्मितीमागील हेतू नेमकेपणाने व्यक्त केला आहे.

पुस्तक आकाराने फार मोठे नसले तरी संदर्भमूल्य पाहता अतिशय महत्त्वाचे आहे. विषय प्रवेशात सदर विषयाची पार्श्वभूमी स्पष्ट केल्यानंतर अॅसिड व अल्कलीज् पासून प्रयोग शाळेत रसायन शास्त्राचे प्रयोग सुरु केले जात या प्रकरणापर्यंत रसायन शास्त्रामधील सर्व मूलद्रव्यांचा प्राचीन व मध्ययुगीन भारतात कसा अभ्यास होई, कसा वापर होई हे स्पष्ट केले आहे. प्राचीन काळी विशिष्ट आकाराच्या यंत्रांचा वापर करून रसायनांच्या तपमानांचा अभ्यास केला जाई. त्या त्या संदर्भात प्राचीन अभ्यास केला जाई. अशा विविध रसायनांसाठी वापरली जाणारी यंत्रे, संबंधित उपकरणे यांची चित्रे पुस्तकात दिली आहेत व त्या चित्रांच्या आधारे रासायनिक प्रक्रिया स्पष्ट केल्या

आहेत. त्या त्या संदर्भात प्राचीन अशा रसायन समुच्चय, रस रत्नाकर इ. ग्रंथातील श्लोक ही दिलेले आहेत. यावरून प्राचीन व मध्ययुगीन भारतात रसायन शास्त्राचा अभ्यास किती प्रगत होता ते स्पष्ट होते. या वेगळ्या अशा विषयावर संस्कृतमध्ये बरेच साहित्य, पण विखुरलेल्या स्वरुपात उपलब्ध आहे. या पुस्तकामुळे हे साहित्य सक्रिय व एकत्रितरित्या उपलब्ध झाल्याने संशोधकांच्या दृष्टीने हे पुस्तक महत्त्वाचे ठरणार आहे. ऑलिम्पियाडच्या निमित्ताने पुस्तक प्रकाशित झालेले असल्याने जगभर हा विषय पुस्तकाच्या माध्यमातून पोहचला आहे.

संदर्भाच्या दृष्टीने या पुस्तकाचे महत्त्व ही निदर्शनास आणणे आवश्यक आहे. संदर्भ (पृ. ४१-४२), मूळ संस्कृत संदर्भ (पृ. ४३ ते ४६), रसशास्त्र आणि इतर संबंधित साहित्याच्या संदर्भातील कालिक रूपे (पृ. ४७), परिशिष्टे व महत्त्वाचे म्हणजे सूची या सर्वांमुळे पुस्तकाचे संदर्भ मूल्य वाढले आहे.

आज रसायन शास्त्र अतिशय प्रगत अशा टप्प्यात आहे. प्रगत पावलेल्या विषयाचे मूळ अभ्यासणे हे विषय समजण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. म्हणूनच रसायन शास्त्र या विषयक साहित्यातील ही महत्वाची भर आहे.

---


**Glimpses of Chemistry in Ancient and Medieval India - Dr. R.P. Kulkarni and Dr. Vijay Bedekar**
**Published - Institute for Oriental Study, Thane**
**July 2001**
**Pages 641.**

---

दोन्ही पुस्तकांचा परिचय

**प्रा. मोहन पाठक**
ग्रंथपाल, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

•••



# कोवळी मने

*मुलांवर संस्कार करायचे म्हणजे काय ? मुले घडवायची म्हणजे काय ? पालकांनी ही या बाबत अंतर्मुख होऊन विचार करावा. - संपादक*

मुले म्हणजे देवाघरची फुले. त्यांचे मन कोवळे असते. या सर्व गोष्टी आपण ऐकतो. वयाच्या सहा वर्षापर्यंत त्यांच्या मनावर होणाऱ्या बारीक सारीक घटना मनात घर करुन राहतात. वयाच्या १४ वर्षापर्यंत त्यांच्यात सतत बदल होत असतात. तसेच त्यांच्या पालकांकडूनही काही अपेक्षा असतात. 'How to be good parents' हे शिकायला कोणतीही शाळा नसते. मुलांना जाणून घेणे फार आवश्यक असते.

पूर्वी मुलांना ठराविक पद्धतीने वाढवताना काही गोष्टी काटेकोरपणे पाळल्या जात. कथा, श्लोक यातून कसे वागावे हे सांगितले जायचे. लवकर उठणे, स्नान-संध्या, पूजा-अर्चा या सर्वांना महत्त्व होते. 'Bed-Tea' ची पद्धत नव्हती. पानात पडेल ते निमूटपणे खायचे. जेवताना वाद घालू नये. दिवेलागणीला शुभंकरोती, अभ्यास, जेवण, झोप संपूर्ण दिनक्रम ठरलेला असायचा.

आज विविध चॅनल्स आपल्या मुलांवर आघात करत आहेत. आपली मुले काय बघत आहेत. त्याचा आपल्या मुलांच्या बालमनावर काय परिणाम होतोय याचा विचार करायला हवा. जस आपलं मूल मोठ होत असत पण सतत ते आपल्या नजरेसमोर असल्याने आपल्या ते लक्षात येत नाही तसे वाईट परीणाम असेच होतात. एखादी धक्कादायक घटना मुलाकडून घडली की मग आपण जागे होतो. तेव्हा फार उशिर झालेला असतो.

लहान वयात मुलांना अनावश्यक ज्ञान प्राप्त होत आहे. 'सॅटेलाईट-चॅनल' आपल्याला काय देत आहे. श्री. प्रवीण दवणे यांनी 'चॅनल-वॉर' या लेखातून लोकांच्या डोळ्यात झळझळीत अंजन घातले आहे.

आपण पालक फार Busy होत आहोत आणि आपली मुले त्यांचा जीव रमवण्यासाठी मार्ग शोधत आहेत. मोठे झाल्यावर परीक्षात त्यांना रेसच्या घोड्यांप्रमाणे धावायचे असते. मुलांमधे चिकित्सा, जिज्ञासा असते. म्हणून मुले एखादे खेळणे नीट निरखून तोडफोड करते परंतु आपण समजून न घेता त्याच्यावर रागावतो. त्यांना समजेल अशा भाषेत उत्तरे देणे फार आवश्यक असते.

मुलांना पालकांच्या सहवासाची अतिशय आवश्यकता असते. त्यांना फार नाही तरी जेवढा वेळ देऊ शकाल तेवढा समाधान पूर्वक द्या. मुले निसर्गाच्या फार जवळ असतात. म्हणून त्यांना मातीत, पाण्यात खेळायला आवडते.

मुलांना सतत बदल हवा असतो. एखादा खेळ ते सतत तोच तो खेळत नाहीत. मुलांनी केलेल्या कृत्याचे योग्य तेवढे कौतुक केले तर मुले खुश होतात. सतत ओरडून हे प्रश्न सुटत नाहीत. जसे झाडाला पाणी कमी घातले तर ते सुकते पण अति झाले तर ते कुजते तसेच आहे.

एकदा मी एका घरी गेले असताना आई व मुलगा हॉलमधे बसले होते. जोरात टी.व्ही. चालू होता. आई भाजी निवडत होती. मुलगा इंग्रजी सिनेमा बघत होता. अतिशय हाणामारी, जाळपोळ त्यात दाखवली जात होती. मधेच मी त्या मुलाकडे बघत होते. त्याने माझ्याकडे त्याच्या आईने सांगूनही एकदाही पाहिले नाही अथवा बोलला नाही.

मधेच तो दात ओठ खात होता, हाताच्या मुठी वळवत होता. त्याचे डोळे मधेच संतापाने चमकत होते. इतका तो त्या सिनेमाशी एकरूप झाला होता. थोड्यावेळाने तो सिनेमा संपला. रिमोट त्याच्याकडेच होता. नंतरही तो विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे नीट देत नव्हता व नीट खात नव्हता. इतका परिणाम त्या फिलमचा त्याच्यावर झाला होता आणि आई कौतुकाने सांगत होती. आमच्या मुलाला कोणत्या दिवशी, कोणत्या वेळी, कोणत्या चॅनलमधे काय सिरियल आहे पाठ असते. धन्य ती माता ! उगाचच बेचैन होऊन मी तिथून बाहेर पडले.

एकदा एका शाळेत असेच सर्व्हे करायचे ठरले व मुलांना सांगितले तुमच्या मनात काय असेल ते चित्रित करा. तुमचे नाव गुप्त राखले जाईल.

एका मुलाने एका तिरडीचे चित्र काढले होते व पुढे एक मुलगा मडके घेऊन चालला होता. त्या चित्राला नाव दिले 'माझे बाबा' सर्व परीक्षक थक्क झाले. त्यांनी त्या मुलाला विश्वासात घेऊन विचारले तेव्हा तो म्हणाला आमच्या घरात बाबा सोडून आम्ही सगळे कष्ट करतो. बाबा आईला दारु पिऊन मारतात. आम्ही मिळवलेले पैसे जुगारात उडवतात. म्हणून हा क्षण येईल तो आमचा सुदीन.

तसे दुसऱ्या चित्रात एक सुंदर टुमदार घर काढले होते. आजूबाजूला सुंदर झाडे आणि घराच्या पायरीवर त्याने लिहिले होते 'संताप !' त्या मुलाला बोलावून विचारले तेंव्हा तो म्हणाला, 'माझे आजोबा नेहेमी सांगतात संताप पायरीवर काढून घरात शिरावे म्हणजे घराची शांतता टिकून राहते! असेही सुंदर संस्कार दिसून येतात. या कोवळ्या मनाला जसे घडवू तसे ते घडते. पण त्यांना समाजातील वाईट प्रवृत्तीपासून दूर राहण्याइतके समर्थ बनवावे.

आपण आपल्या बालपणीच्या आठवणी कितीही मोठे झालो तरी स्मृतिपटलावर असतात. तसे बालमनावर ठसणाऱ्या घटना त्याचे आयुष्य घडवत असतात.

आज पाश्चात्य संस्कृतीचा पगडा वाढत आहे. घटस्फोटांचे प्रमाण वाढत आहे. सर्व गोष्टी बटण दाबताच हाताशी हजर होत आहेत. मुलांच्या आवडी निवडी बदलल्या आहेत. त्यांना राजा-राणीचा, चिऊ-काऊच्या गोष्टी नको असतात. बटण दाबताच विविध चॅनल्स करमणुकीसाठी सज्ज असतात. मुलांची वाचनाची आवडच नष्ट होत चालली आहे. यातून आपल्याला मुलांना घडवायचे आहे.


'धन्यास्त दंग रजःसा मलिनी भवंति ।' या उक्तीप्रमाणे ज्यांची वस्त्रे मुलाच्या खेळण्यामुळे मलिन झाले आहेत असे स्त्री-पुरुष धन्य आहेत. हा कोवळा जीव जन्माला येऊन आपल्याला आनंद देतो तसा आपण त्याच्या जीवनात आनंद फुलवण्यासाठी घडवायला नको का ?

सौ. वंदना प्रसादे

ठाणे.

दूरध्वनी : ५४००६५२

• • •



# महाविद्यालयांची वार्षिके

*प्रवीण गुरव हे आमच्या बांदोडकर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी . दिशातर्फे त्यांना विषय सुचवला तेंव्हा जुने अंक पाहून त्यांनीं लगेच लेख लिहिण्याचे मान्य केले. वार्षिक अंकांवर प्राध्यापक विद्यार्थ्यांनी आणखी लेख दिले तर त्यांचा नक्की विचार करता येईल. - संपादक*

महाविद्यालयातर्फे प्रकाशित होणारी वार्षिके, ती तयार करताना विद्यार्थी संपादक मंडळाची होणारी धावपळ, त्यातून शिकले जाणारे लेखन संपादनाचे धडे हा सर्व एक महत्त्वाचा ठरणारा प्रवास असतो. या वार्षिक अंकामध्ये आपला लेख, आपण नव्यानेच केलेली कविता वा अन्य कोणतेही लेखन आपल्या नावाने छापून यावे, आपणच आपले छापले गेलेले नाव पहिल्यांदाच वाचावे, मित्रांच्या, आईवडीलांच्या कौतुकोद्गारांनी मूठभर मांस चढल्याचे अनुभवावे यातील 'थ्रिल' काही वेगळेच. हा आनंद शब्दात वर्णन करून सांगताच येणार नाही.

या वार्षिक अंकांना खरचं काही महत्त्व असतं का? एक तात्कालिक स्वरुपाचे नियतकालिक , वाचून रद्दीच्या गठ्ठ्यात जमा होणारे. पण या उपक्रमाचा नीट विचार केला तर आपल्या असे लक्षात येईल हे या वार्षिक अंकांचे महत्त्व सापेक्ष आहे. ज्यांचे लेखन छापून आले, नाव छापून आले, फोटो छापून आला त्यांच्या दृष्टीने हे वार्षिक महत्त्वाचे असते. माझ्या एका मित्राने तो वेळगावला ज्या महाविद्यालयात होता, तेथे माजी विद्यार्थी म्हणून गेल्यानंतरचा जो अनुभव सांगितला तो अतिशय भावुक, वेगळा होता. त्याच्याच शब्दात.

" मी कॉलेजात गेलो तर सर्व काही बदललेलं जवळ जवळ वीस बावीस वर्षांनी गेलो होतो. काळाच्या ओघात खूपच सुधारणा झाल्या होत्या. सहज आठवलं फर्स्ट इअरला असताना माझी कविता कॉलेजच्या मॅगझिनमध्ये आली होती. तसेच विषयात पहिला आल्याबद्दल फोटोही होता. कित्येक वर्ष ते मॅगझिन मी जपून ठेवलं होतं. पण जागा बदलताना कुठंतरी नाहीसं झालं. विचार केला, ग्रंथालयात आपल्याला पहायला नक्की मिळेल. कॉलेजच्या लायब्ररीत गेलो. ग्रंथालयातले आमचे दिवस आठवले. आमच्या वेळचे ग्रंथपाल रिटायर झाले होते. नवीन ग्रंथपालांना ओळख सांगितली व त्या मॅगझिन विषयी विचारलं. त्यांनी अगत्याने इतकं जुनं मॅगझिन असलेला, बांधणी केलेला संच काढून दाखवला. कागद जुना झाला होता. कविता शोधली, वाचली. तिच्या खालचं माझं नाव वाचलं आणि इतक्या वर्षातलं अंतर एका क्षणात पार पुसलं गेलं. आपण त्या दिवसात कविता करायचो हे आठवून मोहरून गेलो, भारावून गेलो. आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. त्या वार्षिक अंकाची प्रत मिळणं शक्यच नव्हतं. त्या ग्रंथपाल सरांना विनंती करून झेरॉक्स घेतली. मुखपृष्ठापासून शेवटपर्यंत तीन तीनदा पाने उलटली. मित्रांची नावे, त्या वेळचे फोटो डोळे भरून पाहून घेतले ..... तो आनंद शब्दाच्या पलीकडचा होता " मित्राचा अनुभव ऐकला आणि जाणवलं, आयुष्यातले ते क्षण भावुक असतात, ते वयच मंतरलेलं असतं !

महाविद्यालयाच्या वार्षिक अंकांमधील लेखांना फार काही चिरंतन मूल्य असते असे नाही; किंबहुना वार्षिके निघत राहतात, त्या त्या वेळचे विद्यार्थी संपादनाचे, लेखनाचे धडे गिरवायचा प्रयत्न करतात इतकचं ! त्यातील प्रत्येकजण कवी, लेखक होतोच असे नाही. पण

महाविद्यालयाच्या वाटचालीचा आढावा घ्यायचा असेल तर तीच वार्षिके महत्त्वाचे दस्तऐवज ठरतात. स्थानिक इतिहास (Local History) या विषयाची आपल्याकडे उपेक्षाच अधिक होते, पण स्थानिक इतिहासात या वार्षिक अंकांसारखे दस्तऐवज महत्त्वाचे ठरतात. शिवाय आज ख्यातनाम असणारांपैकी अनेक साहित्यकारांनी त्यांच्या लेखनाचा ओनामा या वार्षिक अंकांमधूनच केलेले असतो. त्या दृष्टीनेही ही वार्षिके महत्त्वाची ठरतात.

आमच्या महाविद्यालयाचे ६९ साला पासूनचे अंक चाळले , तर पाच सात तास सहज निघून जातात व इतिहासाचा एक मोठा पट मनामध्ये उलगडत जातो. आज माजी विद्यार्थी म्हणून कॉलेजला जातो, ग्रंथालयात जातो तेव्हा मनात नेहमी विचार येतो या वार्षिक अंकांचे प्रदर्शन भरवावे व सर्व माजी विद्यार्थ्यांना या प्रदर्शनासाठी निमंत्रित करावे. माजी विद्यार्थी संघटनेसारख्या उपक्रमाच्या माध्यमातून हे सहज करता येईल.

महाविद्यालयांच्या परंपरांचा अंदाज घेता येईल अशी ही वार्षिके भविष्याच्या दृष्टीनेही मोठा ठेवा असतो. त्यामुळे प्रत्येक वर्षी प्रत्येक महाविद्यालयाने काढलेले वार्षिक मागवून घेऊन विद्यापीठ व तत्सम संस्थेने त्यातील निवडक साहित्याचे संपादित स्वरुपात प्रकाशन केले तर आजची युवापिढी काय वाचते, काय पाहते, काय विचार करते याचा मोठा 'डेटा' तयार होईल. शिवाय संगणकासारख्या आधुनिक साधनाचा वापर करुन या वार्षिकातील साहित्य, मुखपृष्ठ स्कॅन करून साठविता येतील.

ही कल्पना आली तेव्हा पाठक सरांना यंदाच्या वर्षातील परिसरातील वार्षिक अंकांची मुखपृष्ठे दिशामधे छापता येतील का असे मी विचारले. पाठकसरांनी तावडतोब होकार दिला. त्यांच्याही मनात हा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे गेल्या शैक्षणिक वर्षातील वार्षिक अंकांची मुखपृष्ठे माझ्या या लेखासोबत त्यांनी दिली आहेत.

महाविद्यालयाचे वार्षिक या विषयावर वेगवेगळ्या दृष्टीने लिहिता येण्यासारखे आहे. निदान या वर्षातील नियतकालिकातील निवडक लेख, कविता या बद्दल रसग्रहणात्मक लेख लिहावे असे मनात आहे. दिशामध्ये असा २०००-२००१ या वर्षातील वार्षिक अंकाचा अभ्यास तरी नोंदला जाईल.

या संदर्भात वि.प्र. मं. च्या दिशाचे खास आभार मला मानायला हवेत कारण वार्षिकांवर लेख लिहिण्याची कल्पना पाठक सरांनी मला दिली, जुने अंक दाखवले व त्यातून मनात हा विषय घोळत राहिला.


**श्री. प्रवीण गुरव**

चेकनाका, शिवाजी नगर, ठाणे.

•••




# महाविद्यालये वार्षिके-मुखपृष्ठे




बांदोडकर
महाविद्यालय




कला आणि वाणिज्य
महाविद्यालय




तंत्रनिकेतन
महाविद्यालय

# नी. गो. पंडितराव स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त भाषणे - कनिष्ठ गट

*ठाण्याच्या कै. नी. गो. पंडितराव आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत कनिष्ठ गटात पारितोषिक प्राप्त ठरलेली दोन भाषणे येथे देत आहेत. विद्यार्थी काय वाचतात, काय विचार करतात हे कळावे. नोंदले जावे हा त्या मागील हेतू आहे. - संपादक*

प्रथम क्रमांक प्राप्त भाषण

## कसं वागायचं ? कसं जगायचं ?

नमस्कार ! अभ्यंकर -कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालयातून मी मंजिरी पटवर्धन 'कसं जगायचं? कसं वागायचं ?' या विषयावरची माझी मतं मांडणार आहे.

उपरोक्त प्रश्नाचा सहज विचार केला, तर सर्वसाधारणतः एकच उत्तर येतं. आनंदात जगायचं आणि चांगल वागायचं !

तस पाहिल तर जगणं आणि वागणं एकच ! परस्परावलंबी क्रिया. शरीरात जोपर्यंत जीव आहे. तो पर्यंत आपण कोणती ना कोणती कृती करणारच ! या कृती संकलित झाल्या की त्यांना म्हणतात जीवन. आपली प्रत्येक कृतीच अंतिमतः मनातल्या चैतन्यावर अवलंबून आहे. मी जिवंत आहे आणि मला जगायचं ही भावनाच सकारात्मक आहे.

'आनंदाने जगणं' हे ध्येय मानलं तरीही आनंद कुठल्या प्रकारचा हा देखील प्रश्न असतोच ! आनंद आणि जल्लोष यात फरक आहे. आनंद हा धर्म, समाज यांच्या चौकटीत राहून मिळवला जातो, मात्र त्याचं जल्लोषात रूपांतर झालं की कुठेतरी नियम तोडायची हुक्की येते. 'एकच प्याला' घेतला तर लगेच माणूस दारुडा होत नाही. पण ती सुरुवात असते आपल्या घसरगुंडीची ! एकदा निसरड्या वाटेला लागलं की पुन्हा सुधारणं कठीण, म्हणून मी योग्य रस्त्यावरूनच जातोय ना ? याची वेळोवेळी खातरजमा करून घ्यावी लागते. आणि तिचं प्रमुख माध्यम आहे 'धर्म!' येथे धर्म हा शब्द मी व्यापक अर्थाने संबोधलाय धर्म म्हणजे माणसाचं कुटुंब आणि समाजाच्या बाबतीतलं कर्तव्य !

दरवर्षी ३१ डिसेंबरला आपण खूप वेळ जागतो. नव्या वर्षाचं स्वागत करण्यात रमून आणि दमून जातो. नव्या वर्षाच्या रात्री पेक्षा, नववर्षाचा पहिला सूर्योदय निश्चितपणे अधिक सुखावह असतो; कारण त्यातून व्यक्त होत असतो तेजाचा महिमा आणि मांगल्य ! मात्र आपला सनी किंवा सोनिया आदल्या रात्रीच्या जाग्रणाने दमून झोपलेले असतात. हा निद्रेचा पडदाच अनेकांचे संकल्प उधळून टाकतो.

धर्माचरण म्हणजेच सत्याचरण. भारतीय संस्कृतीने सांगितलेला धर्म अनेक पातळ्यांवर, असंख्य वेळा तोलून पाहिला गेलाय आणि अशा या संस्कृतीने धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ सांगितले आहेत. त्यामुळे आपलं प्रत्येक कर्म हे या पुरुषार्थांच्या कसोटीत उतरेल असं असलं पाहिजे.

आपल्या धर्मांच सांगणं एकच आहे - 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।' म्हणूनच असेल कदाचित दुसऱ्याला आनंद देण्यासाठी केलेलं कोणतही कर्म आपल्याला उच्चपातळीचं सामधन मिळवून देतं. हा आनंद आपण फार लहान-लहान गोष्टींमधून मिळवू शकतो.

वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारं छोटसं ग्रीटिंगही आपल्या मित्राला सुखावणारं असतं; किंवा ऑफिसातून दमून भागून लोकलचे धक्के खात आलेल्या आईला मुलाने ग्लासभर सरबत जरी प्रेमान दिलं तरी तिचा सगळा शीण निघून जातो. आयुष्यात असे अनेक छोटेमोठे प्रसंग असतात जे आपल्यासाठीच सुखाचा, निर्मळ आनंदाचा ठेवा घेऊन येतात. अनेकदा आपण मात्र खूप मोठा आनंद मिळवण्याच्या नादात असे अनेक लहान लहान, आनंद पायतळी तुडवून टाकतो ! आणि ही सगळी धावपळ ज्या मोठ्या सुखासाठी सुरु असते ते सुद्धा अनेकदा हुलकावणी देऊन जातं. म्हणून मिळणारा प्रत्येक आनंद अनुभवण्यासाठीच जीवनाचं सार आहे.

आपल्या शास्त्राने पंचमहायज्ञ सांगितले आहेत. ब्रह्मयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, भूतयज्ञ आणि मनुष्ययज्ञ हे ते यज्ञ होत.

आज या सगळ्याची जाणीव ठेवणं देखील पुरेसं आहे. कारण ही कर्तव्याची भावनाच योग्य वेळी आपल्याला कृती करायला उद्युक्त करते.

यश मिळवताना, सुखाची आशा धरताना आपल्याला समाजात रहायचं त्यामुळे पैसा मिळवणं ही गरज आहे. मात्र पैशाची गरजच जेव्हा माणसाची कमजोरी बनते तेव्हां माणूस दुष्कृत्य करायला तयार होतो. धन मिळवल्यानंतरची आपली भावना 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारे, उदास विचारें वेच करी ।' इतकी निर्मळ असली पाहिजे. विचार आणि कृतींची ही उंची गाठणं आपल्याला सहज शक्य होणार नाहीच तरीही अंतिम उद्दिष्ट ठाऊक असलं की आपण कुठे आहोत आणि पोचायचंय कुठे याची जाणीव मनात सतत तेवत राहते, देवघरातल्या नंदादीपासारखी.

एखाद्या वस्तू, व्यक्ती वा पदार्थाबाबत कामना निर्माण होणे ही मानवी प्रवृत्ती आहे. पण आपल्या या इच्छा सन्मार्गाने पूर्ण करण्यातच खरा पुरुषार्थ आहे ! अशाप्रकारे आत्यंतिक निष्ठेने धर्म, अर्थ आणि काम हे तीन पुरुषार्थ जो पूर्ण करील तो निश्चितच मोक्षाप्रत पोचेल. समाजात वावरताना आपण स्वतः जपायलाही शिकलं पाहिजे, नाहीतर गतानुगतिकासारखं प्रवाहात वाहण्यात काहीच हशील नाही.

भोग भोगून पशूही जगतात. माणसाचं वेगळपण आहे ते शरीर भावनांच्या पलिकडे जाण्यात ! निसर्गाने मानवाला मन, बुद्धी, कल्पना या त्रयींवर उभं केलयं आणि आज ही निसर्गमाता या अपेक्षेने माणसाकडे पाहतेय की, तो कधीतरी माझ्या मूलतत्त्वापर्यंत पोचेल.

आपल्या चुका जाणवणे आणि त्या सुधारण्याची किमान इच्छा मनांत असणं हीच माणसाच्या माणुसकीची पोचपावती आहे. आपण अनेकदा चुका करतो आणि ती चूकच बरोबर कशी याचं समर्थन मन बुद्धीला आणि बुद्धी आत्म्याला देते. आणि एकदा बुद्धी भ्रष्ट झाली आणि आपण भोगाच्या दुनियेत अडकलो की आपला 'एकच प्याला' व्हायला वेळ लागत नाही. म्हणूनच आत्म्याचा बुद्धीवर आणि बुद्धीचा मनावर अंकुश असणं हेच यशस्वी जीवन आहे.

समाजातल्या अनेक व्यक्ती आणि प्रवृत्ती चांगल्या असतात. वाचन, पाहणं, श्रवण, चिंतन, मनन, अनुकरण या सर्वांमधून माणूस सुधारु किंवा बिघडूही शकतो. दूरदर्शन, पुस्तकं, व्यक्ती आणि निसर्ग इत्यादी अनेक माध्यमांमध्ये माणसात परिवर्तन घडवून आणण्याची क्षमता असते. (फक्त) आपण आपल्या मनाची कवाडं सतत उघडी ठेवली पाहिजेत. मी परिपूर्ण आहे असं म्हणण्यापेक्षा, मी शिकत आहे ही भावना आत्मोन्नतीला पूरक आहे. कोणीतरी म्हटलयं, Go to the world, not to conquer, but to learn !. ते या साठीच ! पुस्तकं आपल्यासमोर थोरामोठ्यांचे आदर्श मांडतात. पु.ल. देशपांडे, मंगेश

पाडगांवकर, इंदिरा संत इत्यादी आनंदयात्रींची चरित्रं खूप काही शिकवतात. अगदी नकळतपणे. आणि निसर्ग तर आपल्या प्रत्येक रूपातून माणसाला शिकवत असतो. भा. रा. तांबेंना शब्द स्फुरलेत -

मावळत्या दिनकरा, अर्घ्य तुज जोडुनि दोन्ही करा ।

जो तो वंदन करी उगवत्या, जो तो पाठ फिरवी मावळत्या ॥

रीत जगाची ही रे सवित्या, स्वार्थ परायणपरा ।

उपरोक्त पंक्ती तंतोतंत खऱ्या असल्या तरी सृष्टीला - तिमिरातून तेजाकडे' नेण्याच्या कर्तव्यात सूर्य कधीही चुकत नाही. त्याचं सांगणं असतं - निरपेक्ष भावनेने कर्तव्य करा! समुद्राच्या लाटा कर्मातलं सातत्य शिकवतात, कर्म करावं पण मर्यादा न ओलांडता! तर अथांग निळं आभाळ 'मन करा रे निर्मळ' अशी साद घालतं. म्हणूनच प्रत्येक गोष्टीकडून व्यक्तीकडून काहीतरी शिकता येतं. एखाद्या वाईट व्यक्तीकडून ही हे शिकता येतं की - मी कसं वागायचं नाहिए! याबाबत एकनाथी भागवतातील एक ओवी स्मरते -

' जो जो जयाचा घेतला गुण, तो तो म्या गुरु केला जाण ।

गुरुशी आल अपारपण, जग संपूर्ण गुरु दिसे ॥'

अशाप्रकारे चराचर सृष्टीतील फक्त सत्य-शिव आणि सुंदर गोष्टी दिसणं ही अंतिम पायरी आहे. शेवटी आत्मोन्नतीतला आनंद हा चैतन्य स्वरुप आणि चिरंतन असतो.

अशाप्रकारे चैतन्याने उत्फुल्ल झालेल्या मनातच स्पर्धा, चढाओढ निर्माण होते. दगडाच्या फटीतून डोकावणाऱ्या हिरव्या पातीप्रमाणे कठीण प्रतिकूल परिस्थितीतच जिंदादील आत्म्याला अंकुर फुटतात.

'ओले मूळ भेदी, खडकाचे अंग ।

अभ्यासासी सांग, कार्यसिद्धी ॥'

असं म्हणणारा एखादा जिद्दी तुकाराम सांगतो, स्वाभाविक प्रेरणेने विरोधाला न जुमानता तू वाटचाल कर! 'उठाऽ राष्ट्रवीर हो, सज्ज व्हा उठा चला, सशस्त्र व्हा, उठा चला, उठाऽ ...' यातलं उठणं आणि चालणं मान्य आहेच. प्रश्न एवढाच आहे की कुठे चलायचं? आणि कसं चलायचं?

आपलं ध्येय कसं असावे हे सांगणारं काही थोर व्यक्तींच लिखाण सापडतं- बुकर टी वॉशिंग्टन या एका कृष्णवर्णीय शास्त्रज्ञाची जीवनगाथा एका गुलाम पोरापासून अमेरिकन पार्लमेंटच्या शास्त्र सल्लागार होण्यापर्यंत कशी जाते ते पाहण्यासारखं आहे. त्याचं एक वाक्य आहे, " Start where you are, Start with what you have, looks something out of that. Never be satisfied !" हेच काव्यमय शब्दांत स्वामी स्वरुपानंद सांगतात -

'ध्येय असावे, खुदूर की जे कधी न हाती यावे ।

जीवे भावे मात्र तयाच्या प्रकाशात चालावे ॥

प्रकाशात चालता, चालता चालणचि विसरावे ।

भावातील सहजस्वभाव ध्येयी तन्मय व्हावे ॥

असं उच्च ध्येय ठरवावं मात्र ते लौकिक यश, पैसा मिळवून पूर्ण होत नाही. कारण अशा यशाचं विस्मरण खूपच लवकर होतं.

जिंदगीसें कमाया खूब, क्या हिरें, क्या मोती ।

क्या करुं यारों मगर कफन मैं जब नहीं होती ॥"

म्हणून ऐहिक काहीही मिळवलं तरी ती जीवनाची साधनसामग्री आहे, ते काही साध्य नव्हे-

वर केलेली सगळी चर्चा मी आता एका कवितेतून सूत्ररूपाने मांडते आपली रजा घेते -

जीवन म्हणजे सुखाचा मेळ

जीवन एक प्रवाह आहे,

कधीही न संपणारा जादुई खेळ आहे
प्रत्येकाला वाहायचं आहे
खेळाचा अंत शोधत रहायचं आहे
वारा आणि वादळातही
पण प्रत्येक जीवनप्रवाहाला किनारा आहे
स्वतःला सावरायचं आहे
अंतःकरण जिंकलां तरच तो गवसणार आहे
अपयशाला पार करुन
अशाच जन्मण्याला जगण्याला अर्थ आहे
यशोमंदिर पार करुन
मेल्यानंतर कीर्तीरुपाने उरण्यात तथ्य आहे
दुःखाने न खचता पुढे जात रहायचं आहे
दुसऱ्याच्या सुखदुःखातही ,
सामील होत रहायचं आहे
इथे भावनेलाही महत्व आहे
पण आधी कर्तव्याला जाणायचं आहे

**मंजिरी श्रीकांत पटवर्धन**

XI Com. A

अभ्यंकर-कुलकर्णी कनिष्ठ महाविद्यालय

रत्नागिरी

**द्वितीय क्रमांक प्राप्त भाषण**

## व्यवसायाच्या नव्या दिशा modelling, anchoring, media-person वगैरे, वगैरे.

Mediaतील व्यवसायांच्या नव्या दिशांचा विचार करण्याच्या आधी आपण व्यवसाय म्हणजे काय, Media म्हणजे काय आणि Media त काय -काय समाविष्ट आहे ह्याचा आढावा घेऊया.

आधी आपण व्यवसाय ह्या शब्दाचा खरा अर्थ शोधूया.

गीतेतल्या एका श्लोकात म्हटल्या प्रमाणे माझे सत्व आणि शारिरीक क्षमतेनुसार. पैसा आणि किर्ती ह्यांची अपेक्षा न करता सतत करत राहिलेले कार्य म्हणजे व्यवसाय.

आज मात्र अपण जो उदरनिर्वाह, पैसा आणि कीर्ती मिळवण्याचे साधन म्हणजे व्यवसाय, असा व्यवसाय ह्या शब्दाचा अर्थ धरतो तो अर्थच मुळी चुकीचा आहे.

Media ह्या शब्दाचा शब्दकोशातला अर्थ असा आहे-वर्तमानपत्रे, रेडिओ, दूरचित्रवाणीसारखी मोठ्या प्रमाणावरील ज्ञानप्रसाराची एकूण सर्व साधने म्हणजे Media. पण गेल्या काही वर्षांत झालेल्या प्रगतीमुळे या व्याख्येची व्यापकता वाढवणे आता गरजेचे झाले आहे.

लोकशाहीचा आधारस्तंभ ठरलेली वर्तमानपत्रे जगभर आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत.

वयाची पंचाहत्तरी पूर्ण करणाऱ्या आकाशवाणीचा स्वस्त आणि मस्त मनोरंजनाचा बालेकिल्ला आजही कोणी सर करु शकलेलं नाही.

दादासाहेब फाळक्यांच्या मूकपटापासून ते जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या सिनेमाउद्योगापर्यंतचा वाढलेला Bollywood चा पसारा पुढेही वाढतच राहणार आहे.

फक्त ३० वर्षांपूर्वी आपल्या घरात घुसलेल्या दूरदर्शनने सर्वांना आपल्या नादी लावलयं आणि भारतात Media बर होणाऱ्या खर्चाचा ५०% हिस्साही काबीज केलाय.

या Media च्या वाढणाऱ्या पसाऱ्या बरोबरच जाहिरात, प्रसिद्धी, जनसंपर्क आणि Marketing. modelling यांचा वापरही झपाट्याने वाढला. जागतिकीकरणामुळे आणि भारतीय बाजारपेठेचे महत्त्व जगातील व्यापाऱ्यांना नव्याने उमगल्यामुळे गेल्या ५ वर्षांत Media तील ह्या उपक्रमांना उधाणच आले आहे.

संगणक युग, माहिती तंत्रज्ञान आणि २४ तास उपलब्धता असलेल्या internet चा Media ला पूरक असा एक सागर निर्माण झालाय.

आणि म्हणूनच Media चा विस्तार एवढा वाढलाय की मनोरंजन, माहिती, ज्ञान यांचा प्रसार आणि एखाद्या गोष्टीची वा व्यक्तीची जाहिरात व प्रसिद्धी करण्याच्या हेतूने समाजाशी संपर्क व दळवळण करण्याची माध्यमं म्हणजे Media असंच आता आपल्याला म्हणावं लागेल.

आत्ताच मी म्हटलं त्याप्रमाणे जागतिकीकरण आणि पाश्चिमात्यीकरणामुळे जगभरच्या उत्पादकांना भारतीय बाजारपेठ खुली झाली. उत्पादनांची संख्या आणि वैविध्य सुद्धा वाढले. म्हणूनच मग छापील माध्यम आणि दूरदर्शनच्या मार्गे ही उत्पादने ग्राहकापर्यंत नेणाऱ्यांना मागणी येणे आणि त्यांच्या संख्येत भर पडणे अपरिहार्य होते. गेल्या दहा वर्षांत Modelling च्या व्यवसायाचा भारतात झपाट्याने विकास झालाय कारण Modelling हा Media तील सर्वात आकर्षक, मोहक आणि सर्वात दृश्य असा व्यवसाय आहे. Modelling चे प्रामुख्याने Ramp Modelling आणि Character Modelling असे दोन भाग पडतात. हे दोन्ही भाग तितकेच महत्त्वाचे अहेत. जो पर्यंत ग्राहक उत्पादनांचा बाजार वाढत राहील तो पर्यंत Modelling व्यवसायही अस्तित्वात राहील कारण ही Models च ग्राहकांना त्या उत्पादनांची उपयुक्तता पटवून देतात आणि ग्राहकांच्या मनात उत्पादनांबद्दल आकर्षण निर्माण करतात. याचाच अर्थ असा की Modelling व्यवसायात या पुढे नवीन - नवीन संधी उपलब्ध होत राहणार आहेत.

आता वळूया Anchoring कडे. व्यवसायात असलेल्या व्यक्तीसाठी या दोन्ही व्यवसायांच्या अस्तित्वाचा काळ साधारणत: ७-८ वर्षांचा असतो. जी क्षितिजापर्यंत जाते आणि क्षितीजाच्यापुढेही जातच राहते, ती दिशा, जो व्यवसाय आयुष्यभर, स्वेच्छा निवृत्तीपर्यंत करता येईल ती व्यवसायाची नवी दिशा. आणि म्हणूनच Media ही एक रेघ मानली तर Modelling आणि Anchoring हे फक्त त्या रेघेवरचे कुठलेतरी दोन बिंदू आहेत.

बरं, मग हे दोन व्यवसाय जर वाढवायचे असतील तर किती आणि कुठले उपाय आहेत, तर मी आधीच म्हटल्याप्रमाणे Modelling आणि Anchoring हे Media तील असंख्य व्यवसायांपैकी फक्त दोनच आहेत. या आधीची प्रसिद्ध व्यक्तींची उदाहरणं द्यायची झाली तरी एके काळी वृत्तनिवेदकाचं काम करणाऱ्या भक्ती बर्वे, ज्या दुर्दैवाने आज आपल्यात नाहीत, आणि प्रदीप भिडे यांनी अन्य क्षेत्रात आपला ठसा उमटवलाय. एकेकाळी मराठी रंगभूमीवरील सामान्य अभिनेता म्हणून गणले जाणारे विजय पाटकर त्यांच्या सामान्य चेहेऱ्यामुळेच आज character modelling मधे कुठल्याकुठे मजल मारुन गेले आहेत. आणि एके काळी भारताचं प्रतिनिधित्व Olympics मधे करण्याचं ध्येय ठेवणारी मधु सप्रे, modelling मधे शिरल्यावर १२ वर्षांनी आजही भारतातील बिनीची म्हणून गौरवली जाते आहे.

म्हणजेच थोडक्यात सांगायचं झालं तर Media तला व्यवसाय कधी आणि कसा बदलावा याबद्दल Media

त कुठल्याही तऱ्हेचा नियम नाही. हे सर्व त्या त्या माणसावर अवलंबून आहे. कारण आजही Media च्या सर्व व्यवसायांत एक प्रचंड पोकळी बाकी आहे. ज्या वेगाने नव्या vacancies आणि निर्माण होतायत त्या वेगाने त्या जागा भरून काढायला उचित मानवशक्ती निर्माण होत नाही. याची कारणं दोन-

पहिलं कारण असं की Media तल्या modelling सारख्या आकर्षक व्यवसायांनी लोकांचे लक्ष एवढं वेधून घेतलयं की तितक्याच महत्वाच्या पण कमी आकर्षक आणि जास्त तांत्रिक अश्या व्यवसायांकडे लोकांचं लक्ष गेलेलं नाही किंवा गेलं असेल तर त्यांचं महत्त्व अजून समजलेलं नाहीए.

दुसरं कारण असं Engineer, doctor, C.A., sportsperson इ. की अशा प्रस्थापित व्यवसायांइतके media तले व्यवसाय प्रस्थापित नसल्यामुळे लोक ह्या व्यवसायांत पाय ठेवायला अजूनही थोडे बिचकतायत.

पण जर आपल्याला या व्यवसायांमध्ये जायचं असेल म्हणजेच media person बनायचं तर आपल्याला काय हवं, ते लक्षात ठेवा. पण आधी media person म्हणजे काय ते बघूया. तज्ञांच्या मते सामान्य आणि समुदायाने जगणाऱ्या जनतेच्या दिवसभरातील कुठच्याही उणीवेला मार्ग दर्शन, प्रबोधन अथवा मनोरंजनामार्गे भरून काढण्याचा दिशेने घेऊन जाणारे प्रत्येक व्यक्तिमत्त्व हे media person म्हणून मानले जाऊ शकते. आणि जेव्हा हे व्यक्तिमत्त्व media तील निवडलेल्या व्यवसायात दैदीप्यमान यश मिळवते आणि समव्यावसायिक आणि जनतेसाठी आदर्श बनते तेव्हा त्या media person ची media personality होते.

मग या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपल्यात कुठली योग्यता आणि पात्रता हवी ?

जर मेहेनत करण्याची तयारी असेल, झटक्यांत विचार करून निर्णय घ्यायची क्षमता असेल. स्वतःला अनेक प्रकारे कार्यक्षमपणे व्यक्त करता येत असेल, निवडलेल्या क्षेत्रांच सखोल ज्ञान असेल, जनमताला समजून घेता येत असेल, स्वतःबद्दल कोणतेही गैरसमज नसतील, नेतृत्व आणि जबाबदारी पेलण्याची क्षमता जर तुमच्यात असेल, योग्य शैक्षणिक पार्श्वभूमी, आणि दूरदृष्टी असेल तर नक्कीच तुम्ही या व्यवसायात यशस्वी होऊ शकाल आणि तुमचा ठसा उमटवू शकाल.

**आदित्य अरुण फडके**

नरसी मोनजी कॉलेज ऑफ कॉमर्स अँड इकॉनॉमिक्स, मुंबई

इयत्ता बारावी

• • •

## आशावाद.....

आपल्याला जर जीवन समृद्ध करायचे असेल तर आशेने भरलेल्या विचारांमध्ये किती आश्चर्यकारक शक्ती असते, हे आपण निश्चितच समजून घेतले पाहिजे. जे काही घडलय ते भल्यासाठीच घडणार आहे, हा श्रीकृष्णाने गीतेमधून दिलेला विचार अंगी बाणवला पाहिजे. आपण जर आशावादी असू तर आपल्या कार्यात उत्साह येईल आणि उत्साह आला की, ध्येय गाठण्यात कोणतीच अडचण राहणार नाही. प्रत्येक गोष्टीसाठी ना.. ना चा पाढा आपण वाचायला नको कारण यामुळे आपण समोरच्या व्यक्तीच्या मनातून उतरू लागतो व मग ते ध्येय पूर्तीसाठी अडचणीत ठरते. तेव्हा वास्तवाचं भान ठेवून आपल्या ध्येयाचा ऐकेक टप्पा ठरवला पाहिजे.

# उध्वस्त जागतिक शांततेचा पहिला बळी - आजचा विद्यार्थी

*जागतिक अशांततेचे परिणाम सर्व दूर आणि खोलवर होत आहे. या संदर्भात विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचा विचार करणारा हा लेख. - संपादक*

त्या दिवशीचा सूर्य त्या देशात तसाच उगवला. सुंदर! तेजोमय ! संपूर्ण जगाला त्या तेजाचं भय वाटावं, आदर वाटावा आणि किंचितसा हेवा वाटावा अशी तेजाळलेली सकाळ घेऊन ! पण .... नेहमी सारखंच मावळणं मात्र त्या दिवशी त्या भास्कराच्या नशिबी नव्हतं. आज आपल्याला ग्रहण लागणार हे त्याच्या गावी सुद्धा नव्हतं. अमेरिका नावाच्या त्या स्वप्ननगरीत रोज सकाळी अवतरताना त्याला विलक्षण अभिमान वाटायचा. माणूस नावाच्या प्राण्याने जन्माला घातलेली ती जादुई विश्वनगरी ! त्या विश्वनगरीला ओळख मी मिळवून देतो, तिचं डोळे दिपवून टाकणारं सौंदर्य मी जगा समोर आणतो. या गोष्टीचा त्याला, हो ! त्या सूर्याला सार्थ अहंकार होता, पण ११ सप्टेंबर ! त्या दिवशी अमेरिका आणि तिचं सौंदर्य याला दृष्ट लागली.

आजही अमेरिकेत सूर्य उगवतो. पण, कवचकुंडलं हरवलेल्या कर्णासारखा. तेजोहीन ! नेमकं काय घडलं ११ सप्टेंबरला ? तो दरारा, ते तेज, ती ताकद, ते सौंदर्य, ते नेतृत्व, ते ग्लॅमर-ती अमेरिका ! सगळं होत्याचं नव्हतं होऊन गेलं. संपूर्ण मानव जातीने ज्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगावा, ज्या कलाविष्कारानं भरभरून कौतुक करावं अशी अमेरिकेतील दोन मानचिन्हं नामक वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि पेन्टागॉन दहशतवाद्यांनी उध्वस्त करुन टाकली. जिला 'सुपरपॉवर' म्हणून गौरवलं होतं त्या अमेरिका नामक महासत्तेला दिलेलं हे पहिलंवहिलं आव्हान ! काही क्षणांचा आत्मघातकी खेळ ! आणि त्या खेळाचा झालेला समाजघातकी परिणाम ! दोन विमानं बेगुमानपणे, बेदरकारीने त्या इमारतींवर आदळली. स्वतःच्या सौंदर्यावर लुब्ध असणाऱ्या एखाद्या रुपगर्वितेचा तोरा क्षणार्धात उतरावा तशी त्या इमारतींची अवस्था झाली. एक क्षण! अंधार! किंकाळ्या! राख ! इतकाच त्या नंतरचा प्रवास ! कितीजण मृत्युमुखी पडले, कितीजण गाडले गेले, कितीजण अपंग झाले याची मोजदादच नाही. मृत्यूचं ते भयानक तांडव बघता बघता डोळ्यातली आसवंही सुकून गेली. स्वतःला सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या मानवाच्या अगतिकतेचा हा बोलका पुरावा.

असं का घडलं? असं घडायला हवं होतं का ? या घटनेचा सूत्रधार कोण ? हा हिंसाचार नेमकं कुठलं वळण घेणार ? अशा असंख्य प्रश्नांची वर्तुळं जागतिक पटलावर घोंगावू लागली. प्रश्न-उत्तर, आरोप-प्रत्यारोप यांच्या फैरी झडू लागल्या क्षणाक्षणाला गुंता वाढतच गेला. दहशतवाद नावाचा राक्षस आता स्थळ, काळ आणि सगळ्या सीमारेषा ओलांडून अमेरिकेसारख्या महासत्तेला पार पावलाखाली नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न करू लागला. साहजिकच या समस्येच गांभीर्य फक्त अमेरिकेपुरतचं मर्यादित न राहता, सगळ्या जगाला जाणवू लागलं. न्यूयॉर्कमधील उठलेल्या आगीच्या ज्वाळांचे चटके थेट रशिया, चीन, भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान यांच्यामार्फत बसू लागले. वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये झालेल्या स्फोटाचे पडसाद जगातल्या प्रत्येक सुजाण, सुशिक्षित व्यक्तींच्या मनात उमटू लागले. आता पुढे काय ? या प्रश्नचिन्हाचा आकार वाढतच गेला. अशात -

उत्तर मिळालं ! पण गुंता सुटला नाही ! तो वाढलाच. अमेरिकेत घडलेल्या घातपाताचा सूत्रधार ओसामा लादेन हा अतिरेकी असल्याचं निश्चित झालं. त्याने

अफगाणिस्तानात आश्रय घेतल्याचं स्पष्ट झाल. वेगानं घडामोडी घडत गेल्या. बघता बघता समस्या एका वेगळ्याच वळणावर येऊन थांबली. राजकारणाच्या पटलावरचा हा खेळ धार्मिक पटलावर कधी येऊन स्थिरावला ते कळलंच नाही. 'जिहाद' पुकारा झाला, आणि धर्मयुद्धाची नांदी, माफ करा एल्गार ऐकू येऊ लागला. 'ही तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात तर नव्हे ?'

क्षणाक्षणाला या प्रश्नाची तीव्रता वाढू लागली. रस्त्यारस्त्यावर, गल्लीगल्ली मध्ये, चौकाचौकात, शाळांमध्ये, कार्यालयात चर्चा रंगायला लागल्या. या चर्चेत सर्वाधिक सहभाग होता, विद्यार्थ्यांचा आणि तरुण तरुणींचा ! खऱ्या अर्थानं नव्या सहस्त्रकाचं प्रतिनिधित्व करणारी ही मंडळी ! प्रसारमाध्यमांनी त्यांच्यासाठी जग खूप लहान करुन टाकलयं. खूप विचार करते ही तरुण पिढी ! कुठल्याही घटनेमुळे फार लवकर प्रभावित होते. सातासमुद्रापलिकडे घडलेली घटना त्यांना आपल्या आजुबाजुला, आपल्या घरात घडल्यासारखी वाटते. आज आम्हाला ही गोष्ट प्रकर्षानं जाणवली, कारण शाळा-महाविद्यालयात शिकणारे आमचे विद्यार्थी या घटनेमुळे हेलावून गेलेले आम्ही पाहिले. अमेरिकेतला भयानक हिंसाचार पाहून विकासाच्या उंबरठ्यावर उभी असलेली त्यांची मनं विषण्ण झालेली आम्हाला जाणवली. घरातले कुणीतरी हरवल्यावर डोळ्याच्या कडा ओलावतात तशाच आता सुद्धा ओलावलेल्या आम्ही पाहिल्या. खूप विचित्र आहे. आजच्या विद्यार्थ्यांची मानसिकता! त्यांच्या डोळ्यांत फक्त दुःख दिसत नाही, दिसतो तो गोंधळ, काळजी, स्वतःचं भविष्य असुरक्षित असल्याची भीती ! स्वतःला घटनेच्या केंद्रभागी ठेऊन हे विद्यार्थी त्या घटनेचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न करतात. पण अवघ्या नवव्या, दहाव्या, अकराव्या किंवा बाराव्या इयत्तेत शिकणाऱ्या या मुलांची प्रगल्भता ती किती असणार? त्यांच्या मनात चालणाऱ्या विचारांना चुकीची दिशा मिळणं अत्यंत स्वाभाविक आहे. तशात त्यांनी हे विचार उघडपणे मांडले तरी त्यांना शिक्षक, पालक किंवा इतर कुणाकडूनही समाधानकारक प्रतिसाद मिळत नाही. साहजिकच ती मुलं कोळ्याच्या जाळ्यात स्वतः कोळ्यानेच अडकावं तशी स्वतःच तयार केलेल्या विचारांच्या चक्रव्यूहात अडकत जातात, आणि याची परिणिती म्हणजे अपरिहार्यपणे येणारा हलगर्जीपणा ! बेदरकारी ! न्यूनगंड ! - आणि तणाव !

एक शिक्षक या नात्याने माझ्या विद्यार्थ्यांच्या या समस्या खूप तीव्रतेने माझ्या समोर आल्या. नेहमी शांत, गप्पगप्प राहणारी मुलं सुद्धा अमेरिकेतल्या दहशतवादाचा विचार करत होती आणि हिरीरीने ते मांडतही होती. वर्गात गेलो आणि अक्षरक्षः त्या विद्यार्थ्यांनी माझ्या चहूबाजूंना प्रश्नांचं मोहोळच उभ केल. युद्ध किती दिवस चालणार ? या युद्धाला कोणते देश असणार ? भारत युद्धात सहभागी होणार का? युद्धामुळे देशामध्ये अंतर्गत युद्ध सुरु होईल का? या युद्धाला धर्मयुद्ध म्हणायचं का ? हे युद्ध किती दिवस, किती वर्ष चालेल ? या प्रश्नापासून सुरु झालेली मालिका शेवटी युद्धामुळे परीक्षा रद्द होणार का ? युद्ध झालं तर आम्ही अभ्यास कसा करणार ? युद्धामुळे आमच्या करियरवर परिणाम झाला तर ? इथपर्यंत येऊन थबकत होती. हा अनुभव फक्त माझा नाही, तर आमच्या संस्थेत काम करणाऱ्या हजारो शिक्षकांचा आहे. या विद्यार्थ्यांना या प्रश्नांची उत्तर हवी आहेत. आणि ती उत्तरं देणं हे तुमचं आमचं सगळ्यांच कर्तव्य आहे. एक शिक्षक म्हणून माझी पालकांना आणि माझ्या सारख्याच इतर शिक्षकांना नम्र विनंती आहे की आपल्या विद्यार्थ्यांच्या, पर्यायाने नवीन पिढीच्या मनात उमटणाऱ्या विचारांचा प्रश्न बालिश वाटण्याचीही शक्यता आहे. पण, ते बालिश नाहीत, फक्त भीतीपोटी त्यांच्या मनात उमटणाऱ्या विचारांचा अनादर करू नका. उलट, त्यांच्या विचार प्रवाहांना एक सुयोग्य दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करा. आज कदाचित तुम्हाला त्यांचे प्रश्न बालिश वाटण्याचीही शक्यता आहे. पण, ते

बालिश नाहीत, फक्त भीतीपोटी त्यांच्या मनात उमटलेले नाहीत, तर त्या विचारांना एक विशिष्ट बैठक आहे. भले ती चुकीची असेल, पण ती चुक सुधारण्याचं काम आपलंच आहे ना ? आपला पाल्य किंवा आपला विद्यार्थी हा युद्धाकडे नकारात्मक दृष्टीने बघत असतांना त्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणण्याची जबाबदारी आपली आहे. तिसरं महायुद्ध झालयं तर, त्यामुळे परीक्षा होणार नाही हा त्यांच्या मनातला विचार काढून टाकून त्याला महायुद्धानंतर शिक्षण घेणं आणि गुणवत्ता प्राप्त करणं अटळ असल्याची जाणीव त्याच्या ठायी निर्माण व्हावी. पालकहो ! आपल्या पाल्यामध्ये लढाऊ वृत्ती (Killing Spirit) जन्माला घालण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्याचं मन हिंसाचारानं व्यथित होत असेल तर याच भावनांना वेगळं वळण देऊन त्यांच्यात एखादा समर्पित देशभक्त निर्माण करता येऊ शकतो, किंवा त्याच्या मनातील टोकाच्या भावनांचा आधार घेऊन त्याला अभ्यास करण्याकरता प्रवृत्त करणं सहज शक्य होतं. सध्या आपला देश आर्थिक मंदीतून जात आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक पातळीवर त्याच्यामध्ये आलेल्या पोकळपणाची जाणीव आपल्याला विद्यार्थ्यांना करून द्यावी लागेल. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगभरात झालेली आर्थिक आणि सामाजिक उलथापालथ सर्वश्रुत आहे. तिसरे महायुद्ध झालचं तर, हीच परिस्थिती पुन्हा उद्‌भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येणारा काळ हा अत्यंत अवघड असणार आहे. यंत्रयुगाची मक्तेदारी असल्यामुळे माणुस या जमातीला नाममात्र महत्त्व उरणार आहे. अशा काळात आपले अस्तित्व लोकांना जाणवून द्यायचं असेल तर स्वतःचं वेगळेपण जपणं आवश्यक आहे. आणि हे वेगळेपण फक्त शिक्षणाच्या जोरावरच जपता येईल. तिसरे महायुद्ध ही मानवी कलहाची आणि नातेसंबंधातल्या दुराव्याची अंतिम पायरी असणार आहे. त्यामुळे या पुढील काळात 'जंगलाचा कायदा' अस्तित्वात येऊ शकतो. अशा वेळी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाला इतरांवर अधिकार गाजवण्यायोग्य बनवणं गरजेचं आहे. प्रत्येक विद्यार्थी नव्यानं येणाऱ्या या आव्हानाला समजून घेऊन स्वतःमध्ये बदल घडवत गेला तर आणि तरच त्याची या जगात वर्णी लागू शकते.

येणारा प्रत्येक क्षण हा शिक्षणाची अपरिहार्यता आणि अटळ आवश्यकता दर्शवणाराच आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. स्वतःचं भविष्य घडवत असतांनाच स्वतःच्या समाजाचं पर्यायाने स्वतःच्या देशाचं भविष्य तो घडवणार आहे. म्हणून आज त्याने विचारलेला प्रश्न हा एकविसाव्या शतकाने तुमच्या समोर निर्माण केलेला प्रश्न आहे. हे विसरू नका सुदैवाने तुमच्या मनाप्रमाणे त्या प्रश्नांच उत्तर शोधण्याची संधी तुम्हाला मिळाली आहे, ती दवडू नका. एक पालक, एक शिक्षक म्हणून स्वतःची भूमिका समजून घ्या, तिच्याशी प्रामाणिक रहा. शिक्षणाचं महत्त्व आपल्या मुलाला समजावत असतानाच सध्या चाललेला मानवी मूल्यांचा ऱ्हास, धर्माच्या नावावर चालवलेली मानवतेची विटंबना, अशोभनीय मानव आणि वित्तहानी या विषयी सुद्धा आपल्या विद्यार्थ्याला जागरूक करा. प्रत्येक वेळी महायुद्धाचा परिणाम म्हणून हुकुमशहाच जन्माला यायला नको. क्वचित कधीतरी गौतमबुद्ध ही जन्माला यायला हवा ! प्रत्येक महायुद्धानंतर एक अवाढव्य ताकदीचा लष्करी देशच उद्याला यायला हवा असं नाही. तर कधीतरी शांतिनिकेतनाचाही उदय व्हायला हवा. महायुद्धाची इतिकर्तव्यता अंधःकारात आहे हेमान्य; पण या अंधःकाराला गर्भातही पहाटेचा वारा लपलेला हवा, आणि ही पहाट घेऊन येणारा युगपुरुष तुमचा पाल्य आणि आमचा विद्यार्थी हवा.

**प्रा.शिरीष लाटकर,**
६, मनोहर पार्क, जोंधळेवाडा, चरई, ठाणे.
दूरध्वनी : ५४११८७१

•••

# एक उद्‌बोधक संवाद

*दोन ग्रंथपालांमध्ये व्यवसायासंबंधात प्रत्यक्षात झालेला संवाद येथे देत आहोत. आपल्याकडील वर्क कल्चर (कार्यसंस्कृती) व ग्रंथपालाने या संदर्भात घ्यावयाची सकारात्मक भूमिका या आशयावर पूर्वी झालेला हा संवाद आहे. त्यातील आशय तर व्यवसायांच्या दृष्टीनेही बोध घ्यावा असा आहे. - संपादक*

ग्रंथपाल म्हणून एखाद्या नामवंत ग्रंथालयात काम करण्यास सुरुवात केली तर त्या ग्रंथालयातील सहकाऱ्यांमध्ये जास्तीत जास्त काम टाळण्याकडे कल दिसून येतो. नामवंत संस्थेचे ग्रंथालय असल्याने ग्रंथपालाच्या मनात अनेक प्रयोग करुन पहाण्याचा विचार असतो. पण ग्रंथालयातील सहकाऱ्यांमधील अनुत्साह, काम ढकलण्याची वृत्ती यांचा ग्रंथालयातील वातावरण निस्तेज होण्यावर व परिणामत: ग्रंथपालातील औत्सुक्य संपण्यात परिणाम होतो. या सर्वांचा ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाशी अगदी निकटचा संबंध असल्याने व मनुष्यबळ हा व्यवस्थापनातील महत्वाचा घटक असल्याने व्यवस्थापनातील हा महत्वाचा ठरेल असा प्रश्न असतो. अशाच परिस्थितीत माझे एक स्नेही ग्रंथपाल सापडले असतानाच त्यांचा व माझा झालेला संवाद येथे देत आहे. यातून व्यवस्थापनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण व्यक्त होतो. या संवादातील 'क्ष' ग्रंथपाल, नामवंत संस्थेचे ग्रंथालय यांची नावे येथे वगळली आहेत कारण महत्त्व त्यांना नसून या संवादातील सुप्त संदेशास आहे.

'क्ष' ग्रंथपाल- येथे आल्यावर कामास सुरुवात करुन थोडा स्थिरस्थावर होत आहे. एकूण परिस्थिती, ग्रंथालय सहकाऱ्यांचे स्वभाव यांचा अंदाज घेणे चालले आहे. लक्षात येतंय ते असं की, माझ्या पूर्वीच्या ग्रंथपालाच्या कारकीर्दीपासून ग्रंथालयात अव्यवस्था आहे. सहकाऱ्यांमध्ये प्रचंड औदासीन्य, अनास्था आहे. कित्येक लाख रुपये ग्रंथालयावर खर्च होतात. ग्रंथालयात प्रशिक्षित, पदवीधर, अनुभवी सहकारी नाहीत असेही नाही. पण ग्रंथालयाचे हाऊसकीपींगही व्यवस्थित नाही. मी येण्यापूर्वी ५-६ महिने ग्रंथपाल पद रिकामेच होते. प्रचंड आळस व अकार्यक्षमता यांनी या मंडळींना ग्रासले आहे. सर्व प्रकारच्या कामाच्या सोयी आहेत, सुखे आहेत पण कार्यसंस्कृतीचा अभाव असल्याने पाट्या टाकणे चालले आहे. आळसालाही किती भयानक कैफ असतो !

मी- तुम्हाला काय वाटते, हे बदलायचे तर काय करावे लागेल ?

'क्ष' ग्रंथपाल- ग्रंथपाल म्हणून विविध ग्रंथालयात वीसेक वर्षे मी काम करतोय. ग्रंथालये, ग्रंथ यांचे सामर्थ्य, महत्त्व, समाजातील स्थान याविषयी मी पूर्णपणे नि:शंक आहे. पण अशा वातावरणात आपल्या क्षमतांवर मर्यादा येतात, हे मला जाणवायला लागलयं. प्रचलित माहिती सेवा (Current Awarness Services), ग्रंथसूचीसेवा अशा सेवा सुरु करण्याबरोबरच ग्रंथालयाचे संगणीकीकरण करण्याची योजना माझ्या मनात आहे. पूर्वीच्या ग्रंथपालाने सुरु केलेल्या पण आता बंद

असणाऱ्या सेवाही बंद पडल्या आहेत. संबंधित कर्मचाऱ्यांशी बोललो, तर या सेवांचा कोणी लाभच घेत नाही, तर या सुरू करू नयेत असाच सूर त्यांनी लावला. माझा उत्साह, उमेद या वातावरणात कितपत टिकेल कोणास ठाऊक. त्यामुळे या ग्रंथालयात स्थिरावणेही कठीण वाटत आहे.

मी- पण, या नामवंत संस्थेच्या ग्रंथालयाचे ग्रंथपालपद हे तुमचे स्वप्न होते. तुम्ही जर ऊमेद सोडायला लागलात तर पुढील वाटचालीस अर्थ रहाणार नाही.

'क्ष' ग्रंथपाल- या वातावरणात इतके शैथिल्य, आळस? आहे की येथे कार्य संस्कृती (Work Culture) निर्माण करणे कठीणच आहे. बरे कर्मचारी एकाएकी बदलून टाकता येत नाहीत.

मी- माझ्या मते ही एक तात्पुरती अवस्था ठरावी. येथील वातावरण, माणसे यांच्यात आमूलाग्र बदल करणे हे आव्हान म्हणून तुम्ही स्वीकारावे. तुमचा तो मूळ स्वभाव आहे. देशाला एक चांगले ग्रंथालय देण्याचे तुमचे स्वप्न आहे. त्यासाठी नकारात्मक विचारांचा स्पर्शही तुमच्या मनाला होणे योग्य होणार नाही. हे निरुत्साही वातावरण बदलण्याचा ध्यास तुमच्या मनात निर्माण झाला पाहिजे.

'क्ष' ग्रंथपाल- स्पॅन मध्ये ऑस्ट्रेलियात पूर्वी झालेल्या एका सेमिनारचा वृत्तांत मी वाचल्याचे आठवते. त्यातील एक मुद्दा मला अतिशय आवडला होता. दारिद्र्याशी सामना करताना दारिद्र्य निर्मूलन विकासाचे कार्यक्रम या बाबी महत्त्वाच्या नसून दारिद्र्य मुळातच निर्माण का व कसे होते या बाबींचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे. ग्रंथालयांच्या बाबतीतही हाच विचार करावा लागेल असे वाटायला लागले आहे. तरच काहीतरी बदल संभवू शकेल!

मी- तुम्ही म्हणताय ते बरोबर आहे. ग्रंथालयाचे तेज कसे झाकाळले जाते, व्यक्तिमत्त्व प्रभावहीन होऊन कार्य संस्कृती कशी लोप पावते याचा शोध घेणे, ते समजावून घेणे ही महत्त्वाची Process आहे. तुमच्या या संस्थेने सुरुवातीपासून ग्रंथालय हा महत्त्वाचा घटक स्थापनेपासून मानला. आज ही व्हीजन तोकडी पडत आहे. त्यामुळे कार्य संस्कृती संपत चालली आहे.

'क्ष' ग्रंथपाल- तुम्ही मांडलात तो विचार चांगला आहे. मला आठवतंय, या संस्थेतील ग्रंथालयाचा विचार मी M.I.T. Institute, London या धर्तीवर करायचो. त्या विचारात रमायचो. पण प्रत्यक्षात गेल्या आठ दहा दिवसातील वास्तव अनुभवता दृष्टी नसली तर काय होऊ शकतो ते अनुभवतोय ?

पण मी या नैराश्याच्या मूड मध्ये अडकून पडणार नाही, तो माझा स्वभावही नाही. तुम्हाला माहीत आहे, अनेक ग्रंथालये मी लावली, तेथे व्हीजन निर्माण केली व नोकऱ्या बदलत राहिलो कारण निस्तेज रहाणे हा गुन्हाच आहे.

मी- मला विवेकानंदांचा एक विचार

आठवतोय. ते म्हणत, 'Think globly, Act locally ' स्थानिक स्तरात सुधार करायचा असेल तर तुमच्या विचारांच्या दृष्टीत संपूर्ण जग सामावून घेण्याची क्षमता असायला हवी.

'क्ष' ग्रंथपाल- आपल्या आजूबाजूची कितीतरी माणसे, संस्था अशा प्रतिकूल परिस्थितीशी झगडत मोठी होतात हे खरेच आहे. आजूबाजूचे वातावरण, पुरेसे साथ देणारे नाही, हे माहीत असूनही किती उत्साहाने ही माणसे काम करतात. मला येथे तेच करावे लागेल. या निरुत्साही सहकाऱ्यांमध्ये सकारात्मक दृष्टी निर्माण करावी लागेल. सबबी सांगणारी माणसे व त्यांचे विचार यात आपण रमलो तर आपल्या हातूनही चांगले काम होणार नाही.

मी- उत्साह भंग करणारे बाहेरील वातावरण आहे तसाच जीवनातील निरर्थकतेचा विचार हे आतील अडथळ्याचे कारण आहे. या दोहोंमुळे अनेक ग्रंथपाल त्यांच्यात क्षमता असूनही सडून जातात व त्या बरोबरच ग्रंथालयाचे व्यक्तिमत्त्वही खराब करतात. त्यामुळे मला असे वाटते की भगवद्गीता, विवेकानंद यांचे विचार अकार्यक्षमतेच्या आजच्या 'काळोख रात्रीत' ताऱ्यासारखे मार्गदर्शक ठरू शकतील.

'क्ष' ग्रंथपाल- हा मुद्दा महत्त्वाचा आहे. गीतेतील क्लैब्यं मा स्म गमः पार्थ (तू षंढासारखा वागू नकोस) ही ओळ मला महत्त्वाची वाटते.

अकरा वर्षांपूर्वी एका नामवंत 'क्ष' ग्रंथपालशी झालेल्या व श्री. ह. श्री. परांजपे यांनी रोजनिशीत नोंदून ठेवलेल्या खऱ्या संवादावर आधारित हा संवाद अतिशय सूचक आहे. ग्रंथालयांचे व्यवस्थापन प्रभावी करावयाचे असेल तर मनुष्यबळ या महत्त्वाच्या घटकाचे प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. तसेच ग्रंथपाल स्वतः सकारात्मक (पॉझिटिव्ह) विचारांचा असेल तर हे शक्य आहे, याची जाणीव या संवादातून होऊ शकेल. ग्रंथपालाच्या अंगी अपेक्षित असणाऱ्या अनेक गुणांची यादी तयार करता येते. त्यात जर दूरदृष्टी (व्हिजन) व सकारात्मक किंवा होकारात्मक दृष्टिकोन त्याच्यात असायला हवा हा महत्त्वाचा गुण असेल तर ही यादी परिपूर्ण होईल.

---


लेखन - ह. श्री. **परांजपे**, निवृत्त ग्रंथपाल

जोशी - बेडेकर महाविद्यालय, ठाणे.

मूळ संवादाचे पुनर्लेखन - **प्रा. मोहन पाठक**

ग्रंथपाल, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

• • •



# ग्रंथ प्रचारासाठी

*ग्रंथ, ग्रंथप्रसार यासाठी आपण काही केले असल्यास 'दिशा' ला अवश्य कळवा या आवाहनानुसार दिशाच्या जुन्या वाचक सौ. काजरेकर यांनी त्यांच्या परीने वैयक्तिक स्तरावर केलेले काही प्रयत्न कळवले आहेत. : इतरही वाचकांनी आपण केलेल्या उपक्रमांची माहिती अवश्य कळवावी. - संपादक*

स्वर्गापेक्षा मी चांगल्या पुस्तकांचे स्वागत करीन. कारण पुस्तक जिथे असले तिथे स्वर्ग निर्माण होईल. या लोकमान्य टिळक यांच्या वरील उक्तीचे यथार्थ दर्शन अशांनाच घडेल, की ज्या व्यक्ती चांगल्या पुस्तकांचा संग्रह करून वाचन-मनन करतात.

मी मॅजेस्टिक बुक डेपोची 'आजीव सभासद' झाले असून कधीही मनात आले की बुक डेपोत जाऊन पुस्तकं घेऊन येते. तसेच 'अक्षर धारा', 'साहित्य यात्रा' या पुस्तक प्रदर्शनांना आवर्जून जाते. आणि पिशवी भरून पुस्तकांची खरेदी करते.

माझ्याकडील संग्रहात पुष्कळशी पुस्तके अध्यात्मिक आणि थोर व्यक्तींची चरित्रे आहेत.

गेल्यावर्षी गोंदवले देवस्थानी जाण्याचा योग आला. तेव्हा तेथील ग्रंथदालनातून काही पुस्तके मी घेऊन आले. तसेच काही महिन्यापूर्वी 'शिवथरघळ' या रमणीय स्थळी ट्रीपला म्हणून गेले असता तेथे रामायण महाभारत यावरील व थोर व्यक्तींची सुंदर चित्रे असलेली लहान मुलांसाठीची गोष्टीरुप पुस्तके घेण्याचा मोह मला आवरता येईना. तसेच लक्षात आले की, हल्लीची खूप मुले इंग्रजी माध्यमातून शिकतात म्हणून वरील प्रदर्शनातून इंग्रजी गोष्टीरुप पुस्तकेसुद्धा घेतलेली आहेत. जेणेकरून आपल्या इतिहासातील थोर व्यक्तींच्या पराक्रमाची माहिती हल्लीच्या मुलांना व्हावी.

ही लहान मुलांची पुस्तके, माझी आई श्रीमती सुधा नांदेडकर हिच्याकडे दिली. आईने माझ्या या इंग्रजी - मराठी पुस्तकांमध्ये सोसायटीतील मुलांकडे असलेल्या पुस्तकांची भर घालून उन्हाळ्याच्या सुटीत घरगुती ग्रंथदालन उघडले. तसेच आता दिवाळीच्या सुट्टीतही हा उपक्रम करणार आहे. जवळपासच्या खूप मुलांनी या ग्रंथदालनाचा आस्वाद घेतला.

ग्रंथप्रदर्शनातून घेतलेल्या नव्या कोऱ्या पुस्तकांना प्लास्टिकची कव्हर्स घालून सोसायटीतील महिलांना तसेच मंडळात जाते तेव्हा काही पुस्तके बरोबर घेऊन विनामूल्य वाचायला देते. जेणेकरून वाचनाची आवड निर्माण व्हावी. माझी ही निवडक पुस्तके त्या कामातून वेळ काढून वाचतात आणि काहीजणींनी तर त्यांच्या जवळ राहणाऱ्या नातेवाईकांनाही आवर्जून वाचायला दिली होती, असेही त्या कौतुकाने सांगतात. असे केल्याने लोकसंग्रह ही वाढण्यास मदत होते.

माझी एक मैत्रिण संस्कार वर्ग घेते. तिच्या उन्हाळी शिबिरातील २५-३० मुलांना, सर्वसमावेशक असे घराघरातून असायलाच हवे असे 'संस्कार धारा' ही छोटेखानी पुस्तिका दिली. तसेच ही संस्कारधारा मी ऑफिसातील पुष्कळ मैत्रिणींनाही दिली असून अजूनही संस्कारधाराची त्यांच्या कडून मागणी आहे.

एका मैत्रिणीला 'रामविजय' हा ग्रंथ सवलतीत मिळवून दिला. तसचे आणखीही काही मैत्रिणींना त्यांच्या आवडीप्रमाणे सवलतीत पुस्तके घेऊन देते आणि आता

तर चातुर्मास चालू आहे. त्यानिमित्त आईकडील वाचक मंडळाला सत्कर्म योगे वय घालवावे या उक्ती प्रमाणे 'भक्तिविजय' हा ग्रंथ विनामूल्य वाचायला दिला आहे.

'समय हीच संपत्ती' स्वेन माडेन यांची ह.अ. भावे यांनी भाषानुद केलेली, वेळेच्या सदुपयोग सांगणारी तसेच ''श्रमदेवतेचे पुजारी व्हा'' अशी तरुणांना उद्बोधक अशी काही पुस्तके काहींना दिली.

''गायत्री उपासना अशी करा'' पं. आनंदघनराम, प्रा. यशवंत पाठक यांचे 'पसायदान' काही मैत्रिणींना भेट म्हणून दिले. त्यांनी चांगल्या अध्यात्मिक पुस्तकांच्या वाचनाचा आनंद मिळाल्याची प्रतिक्रिया मला दिली आणि मी करीत असलेल्या निवडक ग्रंथसंग्रहाचे समाधान मिळाले.

आरोग्य चांगले राखण्यास उपयुक्त 'मुद्रा विज्ञान' हे पुस्तक माझ्या हाती पडले आणि गेल्यावर्षी पासून आजतागत मी 'मुद्रा विज्ञान' ही पुस्तके कित्येक जणींना भेट म्हणून दिली.

काही वयस्क महिलांना मोठ्या ठळक अक्षरातील स्वामी समर्थांबद्दलचे क.आ. परांजपे लिखित 'वटवृक्षाच्या छायेत', शिवाय 'आनंद यात्रा' व. पू. मुकुंदराव करंदीकर यांची अशी वाचनीय पुस्तके व व.पू. करंदीकर यांच्या स्वामी समर्थांच्या पोथ्याही भेट म्हणून दिल्या. जेणेकरून समाजातील व्यक्तींचे आचार विचार चांगले रहावे, ही सदिच्छा.

---

**सौ. अपर्णा काजरेकर**
सत्यजित सोसायटी, प्रशांत कॉर्नरसमोर,
पाचपाखाडी, ठाणे.
दूरध्वनीः ५३३ ४२ ७१

•••

## शिकायचं, कशासाठी ?

आताशा शिक्षणातून नि जीवनानुभवातून मिळणाऱ्या माहितीतून जीवनातील समस्यांच्या निराकरणचे विविध उपाय आपल्याला अवगत होतात. पण त्याग मार्गाचा त्यात समावेश नसतो 'यशस्वी कसे व्हावे', 'श्रीमंत कसे व्हावे' या विषयांवर शेकडो पुस्तके लिहिली गेलीत, पण 'गरीब लोकांच्या उपयोगी कसे पडावे' यावरील साहित्य दुर्मिळ आहे. आपण स्वप्नरंजन करतो, गरिबांच्या सेवेचे त्यागमूर्ती नव्हे, तर विलासी जीवनचे भोगमूर्ती होण्याचे.

त्यामुळे शिक्षण घेताना फक्त पैसा मिळवण्याचे ध्येय ठेवण्यापेक्षा समाजासाठी काही करण्याची इच्छा रुजली पाहिजे.

***

**'दिशा' बद्दलच्या आपल्या प्रतिक्रिया आम्हाला कळवाव्यात.**

**संपर्क :**
**विद्या प्रसारक मंडळ,**
**द्वारा -बेडेकर विद्या मंदिर,**
**नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.**

# गजबजलेले दिवस

परिसर नुसता गजबजून गेला आहे. सहामाही परीक्षांचे वेध लागलेले असल्याने अभ्यास करावाच लागतोय. तरी एकांकिकेच्या रिहर्सलस्, बाहेरच्या स्पर्धा, मिळणारं यश अपयश यामुळे परिसरातील रोजचा दिवस नवा वाटतोय !

या पार्श्वभुमीवर एक खुश खबर ! एक नोव्हेंबर पासून आपल्या महाविद्यालय परिसरातच अत्यंत सवलतीच्या दरात इंटरनेट सर्फिंगची सुविधा उपलब्ध होत आहे. या संदर्भातील 'अपील' याच अंकाच्या शेवटच्या पानावर वाचा. वाचल्यावर त्वरा करा आणि मेंबरशिप मिळवा. दहा रुपये तास म्हणजे चक्क काहीच नाही. थ्रो अवे का काय म्हणतात ना, तशी किंमत. एक पेप्सी घेतला तरी जास्त पैसे जातात. त्यातून एवढ्या कमी पैशात जगातील सर्व माहिती चक्क 'ऑ फिंगर टिप्स', शिवाय मेल करण्याची सोयही आहे. सायबर कॅफेत जायचं, स्पीड कमी केलेला असल्याने तास तास रखडायचं, आणि पैसेही जास्त मोजायचे, त्यापेक्षा हे बरं !

दरम्यान काळाच्या बरोबर जाणाऱ्या आपल्या या परिसरातल्या वांदोडकर कॉलेजात आय.टी. बी.एस्. सी. हा फुल फ्लेज्ड तीन वर्षांचा डिग्री कोर्स सुरु झाला. विद्यापीठाच्या या आय्.टी. बी.एस्.सी कोर्सच्या उद्‌घाटनासाठी आय्. आय्. टी. चे डॉ. दीपक फाटक आले होते. त्या कार्यक्रमाबद्दल-

" जर तुम्हाला यशस्वी व्यावसायिक व्हायचे असेल तर आपल्या व्यावसायिक जीवनची रोजनिशी लिहा. आपण स्वतःहून लिहीत नाही, आपला इतिहास ही दुसऱ्यांनी लिहिलेला आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहितीचे व्यवस्थापन करताना नवीन तंत्रे वापरावी लागणार आहेत, त्यामुळे माहिती व ज्ञान हे आपले मूलभूत लक्ष्य



डॉ. दीपक फाटक

असले पाहिजे. " असे उद्‌गार आय्.आय्.टी. मधील प्रसिद्ध माहिती तंत्रज्ञानांतील प्राध्यापक व संशोधक डॉ. दीपक फाटक यांनी वांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या माहिती तंत्रज्ञान बी.एस्.सी. या अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन करताना काढले. विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बा.ना. बेडेकर समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते.



डॉ. दीपक फाटक यांचे स्वागत करताना प्राचार्य सी.जी. पाटील.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस निहार मयेकर व त्याच्या मित्रांनी 'ओंकार स्वरुपा' हे ईशस्तवन सादर केले. त्यानंतर सर्व प्रमुख मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.




आय. टी. च्या उद्‌घाटन प्रसंगी व्यासपिठावरील मान्यवर.

महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनी समारंभाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचा आढावा घेतला. पदार्थ विज्ञान विभागातील ज्येष्ठ प्राध्यापक व माहिती तंत्रज्ञान अभ्यासक्रमाचे संयोजन डॉ. मनोहर न्यायते यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बटण दाबून संगणकाच्या पडद्यावर अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले.

माहिती तंत्रज्ञानाच्या संदर्भात आपण कुठे आहोत याचे फाटक यांनी मार्गदर्शन करून या नवीन तंत्रज्ञानाच्या युगात स्वतःला लायक बनविण्यासाठी काय करायला हवे ते ही सांगितले. '' मोठ्या माणसांची, कर्तृत्वान माणसांची पुस्तके ही उंच पर्वत असतात व अशी पुस्तके वाचून जग समजते.'' असेही त्यांनी सांगितले. व्यवसायाच्या पिरॅमिड चे त्यांनी केलेले विश्लेषण अतिशय उद्बोधक होते.

कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, उपप्राचार्य डॉ. माधुरी पेजावर व प्रा. मकरंद दीक्षित सह महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. तंत्र निकेतनाचे प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, उपप्राचार्य डी. के. नायक व व्यवस्थापक संस्थेचे प्रमुख प्रा. लाड हे ही कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते.

डॉ. वा. ना. बेडेकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सदर अभ्यास क्रमास शुभेच्छा दिल्या. उपप्राचार्या डॉ. माधुरी पेजावर यांनी अभारप्रदर्शन केले. मुंबई विद्यापीठाच्या तीन वर्षांच्या या पदवी वर्गासाठी साठ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आल्याचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनी सांगितले.

### शिक्षक दिन

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रतिनिधी मंडळाने शिक्षक दिन साजरा करून आपल्या शिक्षकांप्रती असणाऱ्या आदर युक्त भावना व्यक्त केल्या. यात शिक्षकांकरिता गाण्यांच्या भेंड्या (सॉरी, अंताक्षरी), पारंपरिक वेशभूषा आदी कार्यक्रमांचा समावेश होता. केमेस्ट्रीच्या प्रा. प्रकाश माळी सरांनी सादर केलेली 'कडक लक्ष्मी' सर्वांची दाद मिळवून गेली.

याच कार्यक्रमात या वर्षातील कला मंडळाचे औपचारिक उद्‌घाटन करण्यात आले. या निमित्ताने विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम विद्यार्थ्यांनी सादर केले.

हा कार्यक्रम सादर करण्यासाठी विक्रांत भारद्वाज (जी.एस्.), नफीसा मापारी, केतन कांबळे, आकाश भोईर व इतर विद्यार्थी प्रतिनिधींनी पुढाकार घेतला होता. अर्थात

त्यांना मार्गदर्शन होते ते कला मंडळाचे प्रमुख डॉ. आठल्ये सर आणि त्यांच्या सहकारी प्राध्यापकांचे.

**शीतल शेण्डे**



शीतल शेण्डे

एफ्. वाय. (पदवी) मधील शीतलला दादरच्या देववाणी मंदिर या संस्थेच्या संस्कृत गीत गायन स्पर्धेत संस्कृत गीत चाल लावून उत्तम रित्या सादर केल्याबद्दल विशेष पारितोषिकाचा मान मिळाला. प्राचार्य सी.डी. पाटील यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

**बांदोडकरची एकांकिका**

'काळी होती नकटी एक' या विज्ञान महाविद्यालयाच्या एकांकिकेस इनरव्हील क्लब व रोटरी क्लब ठाणे यांनी आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ही एकांकिका आजी माजी नाटकवेड्या विद्यार्थ्यांनी सादर केली आहे. चिरंतन कला मंच या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी चालविलेल्या संस्थेच्या माध्यमातून ही एकांकिका 'सुशीलकुमार शिक्षण संस्था (सायन)' यांच्या स्पर्धेत सादर केली. या स्पर्धेत 'सर्वोत्कृष्ट' पाच पारितोषिके एकांकिकेस मिळाली. लवकरच माननीय मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या उपस्थित या एकांकिकेचा प्रयोग होण्याची शक्यता असल्याचे आठल्ये सरांनी सांगितले.

प्रा. दिलीप परदेशी लिखित ही एकांकिका अमेय समर्थने व भालचंद्र गायकवाडने दिग्दर्शित केली होती.

कला मंडळाने वक्तृत्व, प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धाही घेतल्या होत्या. ऑगस्ट मध्ये झालेल्या या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद होता.

**वक्तृत्यातील पारितोषिके**

| | | |
|---|---|---|
| अ गट (मराठी) | | स्नेहा सावंत |
| ब गट (इंग्रजी/हिंदी) | प्रथम | भूमिका दवे |
| | द्वितीय | राहुल हुबळीकर |
| | तृतीय | पाण्डेय |

परीक्षक - प्रा. सौ. उषा वाळ, प्रा. सौ. नायर व प्रा. ए.डी. आठवले.

**निबंध स्पर्धा**

| | | |
|---|---|---|
| अ गट (मराठी) | प्रथम | स्नेहा सावंत |
| | द्वितीय | सोपाविनी फाळके |
| ब गट (इंग्रजी/हिंदी) | प्रथम | सुयोग भिसे |
| | द्वितीय | पाण्डये |
| | तृतीय | अविनाश पै |

**प्रश्न मंजुषा**

| | |
|---|---|
| प्रथम क्रमांक | सत्यजित शाळिग्राम |
| द्वितीय क्रमांक | बसण लखंद |
| | अक्षय पावसकर |
| | अमृता जोशी |

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.)**

◊ ९ एप्रिल २००१ ते २६ एप्रिल २००१ या कालावधीत शाळेत ऑईल पेंटिंगचे छंद वर्ग घेण्यात आले. या वर्गात १० मुले सहभागी झाली होती. त्यांची चित्रे आंतरशालेय स्पर्धेसाठी पाठवण्यात आली. त्यात अश्विनी

दळवे हिला रु. ४००/- चे द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व ग्रंथाली फडणीस, मोनिका कांबळी, भूषण पाटील, श्वेता शिकमडे यांना उत्तेजनार्थ पारितोषिके प्राप्त झाली. त्यांना आपल्या कलाशिक्षकांनी मार्गदर्शन केले.

◈ मे महिन्याच्या सुटीत ज्ञानदीप कलामंच तर्फे बालनाट्य झाली. त्यात आपल्या शाळेतील प्रणव दांडेकर (५अ) याचा सहभाग होता. या नाटकांचे २५ प्रयोग झाले. त्यानिमित्त झालेल्या समारंभात त्यास प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले. तसेच आपल्या कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांस विशेष सहाय्यक म्हणून प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले.

◈ मे महिन्याच्या सुटीत इ. १० ड साठी मा. श्री. वि.र. गोडे यांनी सतत आठ दिवस इंग्रजी व्याकरणाचे मार्गदर्शन केले.

◈ शालांत परीक्षेचा निकाल जूनमध्ये जाहीर झाला. आपल्या शाळेचा निकाल ९४.६४% इतका लागला. कु. प्रणव मिलिंद पेंडसे हा गुणवत्ता यादीत १८व्या क्रमांकावर चमकला.

◈ इ. ५वी च्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापकामार्फत स्वागत झाले. तसेच प्रत्येक वर्गाची पालकसभा होऊन पालक शिक्षक संघाच्या सभासदांची निवड करण्यात आली.

◈ इ. ८वी साठी श्रीम. लीला जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना IQ वाढण्यापेक्षा EQ ( E for emotion) वाढण्याची वेळ व परिस्थिती आता निर्माण झाली आहे. असा विचार त्यांनी मांडला.

◈ १५ ऑगस्ट २००१ रोजी इ. ९ अ व १० अ च्या विद्यार्थ्यांची नेहरु सायन्स सेंटर, नेहरु प्लॅनिटोरियम व वरळी डेअरी येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. सहलीचे आयोजन आपल्या विज्ञान शिक्षिका सौ. अंजली पंडित यांनी केले व त्यांना आपले प्रयोग शाळा सहाय्यक श्री. सदाशिव भोईर यांचे सहकार्य लाभले. या सहलीत वर्गशिक्षिका व शास्त्रशिक्षिका तसेच पर्यवेक्षक सहभागी होते.

◈ होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेसाठी इ.६वी चे ६० व इ. ९वी चे ४३ विद्यार्थी बसले आहेत.

◈ इ. ९वी, १० क, ड च्या विद्यार्थ्यांच्या पालकांची एक सभा आयोजित करण्यात आली. मा. मुख्याध्यापिका, पर्यवेक्षक व विषय शिक्षक यांनी अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी शाळेतील शिस्त कशी पाळावी या बाबतीतही पालकांना सांगण्यात आले.

◈ एप्रिल २००१ मध्ये महाराष्ट्र राज्य प्रज्ञा शोध परीक्षा घेण्यात आल्या. त्या परीक्षेत आपल्या शाळेतील सुयोग संजीव मपारा (१०अ) यास राज्य शिष्यवृत्ती प्राप्त झाली. तो राज्यात गुणवत्ता यादीत १४व्या क्रमांकावर चमकला. ग्रंथाली प्रकाश फडणीस (१०अ) ही विद्यार्थिनी जिल्ह्यात १ली आली व तिला जिल्हा शिष्यवृत्ती प्राप्त झाली. याच परीक्षेत हृषिकेश राजन चुंबळे, गिरीश सोंडुलकर यांना उत्तेजनार्थ प्रशस्ती पत्रके प्राप्त झाली.

◈ ब्राह्मण संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या लो. टिळक वक्तृत्व स्पर्धेत पैसास (९अ) हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

◈ कुमार कला केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत सिद्धिका पैसास (९अ) हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

◈ कुमार कला केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत इ. ९वी, १०वी च्या गटात रोहन शास्त्री (९ब) यास उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. याच केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या गायन स्पर्धेत ९वी, १०वी च्या गटात

कु. स्वप्ना गोरे (९अ) हिला प्रथम क्रमांकाचे तर अनुजा नामजोशी (९अ) हिला द्वितीय क्रमांकाचे प्रशस्तिपत्रक प्राप्त झाले.

◈ कै. लक्ष्मी रानडे वक्तृत्व स्पर्धेत मृणालिनी नेवाळकर (९अ) व सिद्धिका थैसास (९अ) या सहभागी झाल्या होत्या. पैकी सिद्धिका थैसास हिला प्रशस्तीपत्रक प्राप्त झाले. ही स्पर्धा पुणे येथे संपन्न झाली. नियोजित आणि आयत्यावेळची अशा दोन्ही प्रकारचा या स्पर्धेत सहभाग असतो. तसेच ही स्पर्धा राज्यपातळीवर घेतली जाते. वरील दोन्ही विद्यार्थिनिंना सौ. उषा कळमकर यांनी मार्गदर्शन केले.

◈ ब्राह्मण सेवा संघातर्फे दिल्या जाणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराचा मानकरी ठरल्या विज्ञान शिक्षिका सौ. अनुराधा खोपकर.

◈ शाळेत दि. ५ सप्टेंबर २००१ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सरस्वती सेकंडरी स्कूलचे माजी मुख्या. श्री. अशोक टिळक उपस्थित होते. या कार्यक्रमात सौ. सुमतीबाई टिलू पारितोषिक जाहीर करण्यात आले. या वर्षी हे पारितोषिक आपल्या शास्त्र शिक्षिका सौ. अंजली पंडित यांना प्राप्त झाले.

◈ शासकीय चित्रकला परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांची एक सभा ९ सप्टेंबर २००१ रोजी आयोजित केली. यात या परीक्षांचे पुढील जीवनातील महत्त्व विशद केले आर्ट डायरेक्टर, कला शिक्षक मा. व्हि. एस्. सिन्नरकर यांनी, तर शालेय स्तरावरील चित्रकला विषयाचे महत्त्व आपल्या कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी केले. त्यांना श्री. कोळी व श्री. वैद्य यांनी सहाय्य केले. या सभेस पालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

◈ शिक्षक आमदार श्री. सुरेश भालेराव यांनी शाळेला सदिच्छा भेट दिली. शिक्षकांच्या समस्या व त्या सोडविण्यासाठी चाललेले प्रयत्न याचे सविस्तर विवेचन त्यांनी केले. तसेच शिक्षकांच्या शंकांचे निरसनही त्यांनी केले.

**(शाळेतील वार्तांचे संकलन सौ. मंजिरी दांडेकर यांनी केले आहे.)**

**बांदोडकर महाविद्यालय :**

बारावीमधील सृष्टी अंकोलीकर हिला रत्नागिरी येथील विकास सहयोग प्रतिष्ठान आणि विकास अनुभव



**सृष्टी अंकोलीकर**

केंद्र यांनी कोकण स्तरावर आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेत प्रथम पारितोषिक मिळाले. सदर परीक्षेचा विषय "एकतर्फी प्रेम आणि हिंसा" हा होता. या आधी सृष्टीला ऋणाली आयोजित तरुणाई या विषयावरील कविता स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळालेला होता.

**कला-वाणिज्य महाविद्यालय**

कला-वाणिज्य महाविद्यालयात गेला महिना हा पारितोषिकांचाच महिना होता. ही पारितोषिक व पारितोषिक प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

१) ठाण्याच्या रोटरी क्लबने आयोजित केलेल्या एकांकिका स्पर्धेत 'सारीपाट' या एकांकिकेस प्रथम पारितोषिक मिळाले. सदर एकांकिकेचे लेखन आणि

दिग्दर्शन श्री. राजेश राणे यांनी केले होते. या एकांकिकेतील प्रसाद जोशी (प्रथम वर्ष वाणिज्य) याला पुरुष गटातील सर्वोत्कृष्ट अभिनयाचे तर पल्लवी वाघला (प्रथम वर्ष कला) स्त्री गटातील सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक मिळाले.

२) 'स्वरांजली अंबरनाथ' आणि रोटरी क्लब ने आयोजित केलेल्या संगीत स्पर्धेत द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गातील सागर टेमघरे याला पॉप संगीतासाठी प्रथम क्रमांकाचे तर प्रीती आणि प्रिया निमकर यांना द्वंद गीतासाठीचे प्रथम पारितोषिक मिळाले. ठाण्याच्या रोटरी क्लबच्या संगीत स्पर्धेतही सागरला प्रथम क्रमांक मिळाला तर श्रीरंग टेंबेला द्वितीय क्रमांक मिळाला.

३) मुंबई विद्यापीठाच्या युवक महोत्सवात टी.वाय. कॉमर्सच्या केदार जगताप, कपिल पंडित आणि सुहास शेजवळ यांना प्रश्नमंजुषेसाठी तृतीय क्रमांक मिळाला. तर याच महोत्सवाच्या संगीत स्पर्धेत एफ.वाय. कॉमर्समधील चिराग पांचाळला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. टी.वाय. आर्टस्मधील सोनाली कुलकर्णीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या निबंध स्पर्धेत दुसरे पारितोषिक मिळविले.

४) विद्यापीठ युवक महोत्सवातील आणखीन एका पारितोषिकाची नोंद म्हणजे रेखा जयसवाल हिने चित्रकलेत मिळवलेले तृतीय पारितोषिक होय.

५) के. सी. कॉलेजने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन नृत्यस्पर्धेत व्यवस्थापन अभ्यासक्रमाचा प्रथम वर्ष पदवी वर्गातील 'डेनिस नायर' आणि समूह यांना पाश्चिमात्य समूह स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.



'हिंदी दिवस' १५-९-२००१ प्रा. स. या. गोखले प्रमुख पाहुणे श्री. रतनकुमार पाण्डे यांचे पुष्पगुच्छ स्वागत करताना.

६) १५ सप्टेंबर रोजी 'हिंदी दिन' साजरा करण्यात आला. या निमित्ताने मुंबई विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे अध्यक्ष श्री. रतनकुमार पांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी झालेल्या कवी संम्मेलनात प्रा. रोषनकुमार भिगानीया, श्री. विष्णु सरवदे, श्री. श्रीवास्तव, प्रा. दामोदर मोरे आदी कवींनी कविता सादर केल्या.

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही विविध स्पर्धांमध्ये भाग घेतला होता. त्यातील ११ वी (कला शाखा) मधील मृणालिनी कुलकर्णी हिला भांडुप येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन काव्यस्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. तर कॉलेज कॉर्नरतर्फे घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत बारावी कलाशाखेतील रक्षा माहीमकर हिलाही उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

सध्या महाविद्यालय परिसरात आय्. एन्. टी. या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेच्या तयारीचे वारे वाहत आहेत. तसेच ऑक्टोबरच्या परीक्षांचे दिवसही क्षितिजावर उगवत आहे.

प्रा. मोहन पाठक